रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ६३
www.ramprahar.com
शनिवार, २० सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

रायगडातील तीन शिक्षकांना राज्य गुणगौरव पुरस्कार/२
शून्य विद्यार्थी, तरीही शाळा सुरूच!/५
माथेरानचे विद्यार्थी रिले शर्यतीत अव्वल/८

## देशातील ४७४ पक्षांची नोंदणी रद्द; निवडणूक आयोगाची कारवाई

**नवी दिल्ली :** निवडणूक आयोगाने पुन्हा एकदा मोठी कारवाई करीत मान्यताप्राप्त नसलेल्या ४७४ राजकीय पक्षांची नोंदणी रद्द केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ४४ पक्षांचा समावेश आहे. निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार कोणत्याही राजकीय पक्षाला सहा वर्षांतून किमान एकदा निवडणूक लढवणे गरजेचे आहे. या नियमाचे ज्या पक्षांनी पालन केले नाही त्यांना निवडणूक आयोगाने दणका दिला आहे. लोकप्रतिनिधी कायदा १९५१च्या कलम २९ अ अंतर्गत घालून दिलेल्या अटींनुसार ही कारवाई करण्यात आली आहे. यापूर्वी निवडणूक आयोगाने ऑगस्टमध्ये ३३४ पक्षांना यादीतून काढून टाकले होते, तर गेल्या दीड महिन्यामध्ये ८०८ पक्षांवर कारवाई केली आहे. आयोगाने संबंधित पक्षांना नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याचे निर्देश राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना दिले होते.

# कर्मयोगी भावनेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी कार्यरत -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या ११ वर्षांपासून देशाच्या सर्वोच्च पदावर असूनही कर्मयोगी या भावनेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी काम करीत आहेत. त्यांचे व्यक्तिमत्व कसे घडले हे 'चलो जीते है' या चित्रपटाच्या माध्यमातून पहायला मिळणार आहे. त्यामुळे सर्वांनी हा चित्रपट पहावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवसानिमित्त भाजप पनवेल शहरच्या वतीने चलो जीते है या चित्रपटाचा मोफत शो आयोजित करण्यात आला आहे. ओरियन मॉलच्या पीव्हीआर स्क्रीनवर १७ सप्टेंबरपासून पुढील सहा दिवस हा चित्रपट रोज सायंकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी दाखवला जाणार आहे. या चित्रपटाच्या पहिल्या शोसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्या वेळी ते बोलत होते. या उपक्रमाचे संयोजन शहर उपाध्यक्ष केदार भगत यांनी केले आहे.

या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, **(पान २ वर..)**

## 'लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी करा'

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.

याबाबत मंत्री तटकरे यांनी एक्स प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत या योजनेत पारदर्शकतेला सर्वोच्च प्राधान्य शासन देत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे येत्या दोन महिन्यांच्या कालावधीत सर्व लाडक्या बहिणींना ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

## दिल्ली विद्यापीठात 'अभाविप'चा विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या निवडणुकीत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने उत्कृष्ट कामगिरी करीत चारपैकी तीन पदांवर दणदणीत विजय मिळवला आहे. या निकालांमुळे काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे तरुण, विद्यार्थी आणि झेन-झेड पिढीला आकर्षित करण्याचे स्वप्न भंगले.

अध्यक्षपदावर 'अभाविप'चे आर्यन मान, सचिवपदी कुणाल चौधरी आणि संयुक्त सचिव पदावर दीपिका झा यांचा विजय झाला आहे. 'अभाविप'च्या तिन्ही उमेदवारांनी दणदणीत विजय मिळवला. आर्यन मानला २८ हजार ८४१ मते मिळाली आहेत. त्याने जोललिन चौधरीचा सुमारे १६ हजार मतांनी पराभव केला. सचिवपदाच्या निवडणुकीत कुणाल चौधरीला २३ हजार ७७९ मते, तर संयुक्त सचिवपदाच्या निवडणुकीत दीपिका झा हिला २१ हजार ८२५ मते मिळाली. या दोघांनी अनुक्रमे कबीर (१६,१७७ मते) आणि लवकुश भडाना (१७,३८० मते) यांचा पराभव केला.

## वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. हेमा साने यांचे निधन

**पुणे :** वनस्पती क्षेत्राच्या एनसायक्लोपीडिया अशी ओळख असलेल्या ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. हेमा साने यांचे शुक्रवारी (दि.१९) पहाटे पुण्यात निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या.



निसर्गाशी एकरूप होऊन राहण्याची जीवनशैली डॉ. हेमा यांनी आयुष्यभर सांभाळली. विशेष म्हणजे पुण्यात राहूनही त्या वीज आणि इतर आधुनिक सुविधांशिवाय जीवन जगल्या.






# भविष्यात ग्रीन स्टील क्षेत्रातही महाराष्ट्र सर्वोत्तम ठरेल -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राला केवळ स्टील उद्योग क्षेत्रातच नव्हे तर ग्रीन स्टील उद्योग क्षेत्रातही देशातील सर्वोत्तम राज्य बनवायचे आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मिशन ग्रीन स्टीलमध्ये महाराष्ट्र सर्वांत मोठी भूमिका बजावेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.




एआयआयएफए (आयफा) स्टीलेक्स २०२५ या स्टील महाकुंभचे उदघाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गोरेगाव, मुंबई येथे करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी, उद्योग मंत्री डॉ.उदय सामंत, उद्योग सचिव डॉ.पी. अन्बळगन, यू.एन.डी.पी. इंडिया प्रमुख डॉ.अँजेला लुसी, आयफाचे अध्यक्ष योगेश मंधाणी, आयफाचे मानद सरचिटणीस कमल अग्रवाल, लॉयड्स मेटल्स एनर्जी लिमिटेड बालासुब्रह्मण्यम प्रभाकरन, इलेक्ट्रोथर्म इंडिया लिमिटेडचे सूरज भंडारी तसेच उद्योजक उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पॅरिस करारावर स्वाक्षरी केली तेव्हा अनेकांना वाटले की हे अशक्य ध्येय आहे, पण भारताने वेळेआधी ग्रीनहाऊस गॅस उत्सर्जन कपात आणि ऊर्जा निर्मिती व्यवस्थेत बदल करून दाखवले. आता भारत पर्यावरणीय शाश्वततेचे उदाहरण ठरत आहे.

सन २०३० पर्यंत महाराष्ट्राच्या ऊर्जा मिश्रणात ५८ टक्के वीज ही अक्षय ऊर्जेतून येणार आहे. २०२६ पर्यंत राज्यातील शेतकऱ्यांना दिली जाणारी १६,००० मेगावॅट वीज पूर्णपणे सौरऊर्जेतून दिली जाणार आहे. त्यामुळे वीजदरांवरील अनुदान कमी होणार असून उद्योगांसाठी वीजदर पुढील पाच वर्षे दरवर्षी कमी होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

गडचिरोली, नक्षलवादासाठी ओळखले जाणारे आता देशाची नवी स्टील सिटी होणार आहे. गेल्या दहा वर्षांत तेथील माओवाद संपुष्टात आणण्यात आला असून स्थानिक समुदाय स्टील उद्योगाला पाठिंबा देत आहेत. राज्यात आतापर्यंत ८०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक स्टील उद्योग क्षेत्रात आली असून, पुढील काळात महाराष्ट्र देशात स्टील उत्पादनात पहिल्या क्रमांकावर असेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

गडचिरोलीत ५ कोटी झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवले असून त्यापैकी ४० लाख झाडे लावण्यात आली आहेत. गडचिरोलीत जल, जमीन, जंगल यांचे जतन व संवर्धन करत स्टील उद्योगासाठी नवी इकोसिस्टम उभारणार आहोत. ग्रीन हायड्रोजन, ग्रीन अमोनिया, गॅस व्हॅल्यू चेन आणि बॅटरी स्टोरेज यामध्ये महाराष्ट्र आघाडीवर असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

पंप स्टोरेजद्वारे ऊर्जा साठवणूक संदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंप स्टोरेज प्रकल्पांसाठी महाराष्ट्राने आतापर्यंत ७५,००० मेगावॅटचे सामंजस्य करार केले आहे, दोन वर्षांत ७,००० मेगावॅट वीज उत्पादन सुरू होईल. यामुळे ग्रीन पॉवर २४/७ उपलब्ध करून देता येईल

# कोंडे गावात पुलाअभावी मृतदेह नदीतून वाहून नेण्याची वेळ

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



प्रशासनाचा डोळेझाकपणा

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन हद्दीतील कोंडे गाव आजही विकासाच्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. गावाकडे जाण्यासाठी कायमस्वरूपी पूल नसल्याने गावकऱ्यांना दैनंदिन जीवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मात्र, परिस्थिती एवढी गंभीर आहे की मृतदेह वाहून नेण्यासाठीही ग्रामस्थांना थेट नदीत उतरावे लागते, हा प्रकार २१व्या शतकात अत्यंत लाजिरवाणा मानला जात आहे.

गेल्या दोन वर्षांपासून कोंडे गावातील ग्रामस्थ पुलाच्या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करत आहेत. जिल्हा परिषद सीईओ, जिल्हाधिकारी, संबंधित विभाग प्रमुख यांना लेखी अर्जासह व्हॉट्सॲप संदेशही पाठवले गेले. कृपया तातडीने पुलाचे काम हाती घ्या, गावाला न्याय द्या असा थेट आग्रह ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केला आहे. तरीसुद्धा अद्याप काहीच हालचाल झाली नसल्याने गावकऱ्यांमध्ये संताप वाढत आहे.

रायगड जिल्ह्यात गेल्या दोन वर्षांपासून पालकमंत्री नेमण्यात आलेला नाही. याचा थेट परिणाम कोंडे सारख्या दुर्गम गावांवर होत असल्याचे ग्रामस्थांचे मत आहे. जर पालकमंत्री असते, तर हा प्रश्न कित्येक दिवसांपूर्वी सुटला असता. आज मृतदेह वाहून नेण्यासाठी नदीत उतरावे लागत आहे, याला जबाबदार कोण? असा ग्रामस्थांचा थेट सवाल आहे. एवढ्या तंत्रज्ञानाच्या युगात लोकांना मृतदेहही नदीतून वाहून न्यावा लागतो, याहून मोठा प्रशासनाचा अपमान कोणता? हा प्रश्न केवळ कोंडे गावापुरता मर्यादित नसून, तालुक्यातील अनेक गावांवर याच स्वरूपाची परिस्थिती आहे. हे गंभीर मानवाधिकाराचे उल्लंघन असून त्वरित दखल घेणे आवश्यक आहे, असे मत स्थानिक अभ्यासकांनी नोंदवले आहे.ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट असून, आता तरी जिल्हा प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी अशी मागणी होत आहे. कोंडे ग्रामस्थांना अजून किती काळ मृतदेह नदीतून वाहून न्यायची लाजिरवाणी वेळ येणार? हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

# टीईटी परीक्षा बंधनकारक; शिक्षकांसमोर पेच

**अलिबाग : प्रतिनिधी**

सेवेत कायम रहायचं असेल तर शिक्षकांना आता टीईटी म्हणजे शिक्षक पात्रता परीक्षा पास होणं बंधनकारक करण्यात आलंय. वयाची ५२ वर्षे उलटून गेलेल्या शिक्षकांना यातून वगळण्यात आलं आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयामुळे शिक्षकांपुढे मोठा पेच निर्माण झालाय. परीक्षा पास झाले नाही तर शिक्षकांवर नोकरी गमावण्याची वेळ येवू शकते. या विरोधात आता राज्यातील शिक्षक संघटना एकवटल्या आहेत. राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णया विरोधात पुनर्विचार याचिका दाखल करावी अशी शिक्षक संघटनांची मागणी आहे.

शिक्षक होण्यासाठी डीएड किंवा बीएड करून उपयोग नाही, तर टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य केले आहे. सन २०१३ पासून ही परीक्षा सक्तीची केली आहे. त्यामुळे डीएड, बीएड चांगल्या गुणवत्तेने उत्तीर्ण होऊनही टीईटी पास नसल्यामुळे अनेकजण बेरोजगार आहेत. मात्र, टीईटी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील टेट परीक्षा द्यावी लागत असे, त्या परीक्षेतील गुणवत्तेनुसार शिक्षकांची नियुक्ती करण्यात येत असे. गेल्या काही वर्षात याचप्रकारे राज्यात बारा हजार शिक्षकांची भरती करण्यात आली. परंतु, आता शिक्षकांना सेवेत कायम राहायचे असेल तर व पदोन्नतीचा लाभ घ्यायचा असेल तर टीईटी उत्तीर्ण व्हावे लागणार आहे. सेवेचा निम्मा काळ संपल्यावर परीक्षा द्यावी लागणार आहे.

सेवानिवृत्तीसाठी पाच वर्षे शिल्लक असणाऱ्या म्हणजेच ५२ वर्षांवरील शिक्षकांना शासनाने टीईटी परीक्षेतून सवलत दिली आहे. त्यामुळे या शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण असण्याची सक्ती नाही. मात्र, उर्वरित शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण व्हावे लागणार आहे. परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अभ्यास करावा लागणार आहे.

जे शिक्षक टीईटी देणार नाहीत किंवा टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत, अशा शिक्षकांना सक्तीचा राजीनामा देऊन सेवानिवृत्ती घ्यावी लागणार आहे. ५३ वर्षापर्यंतच्या सर्वच शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण असण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. नोकरी टिकवण्यासाठी टीईटी अनिवार्य आहे. त्याप्रमाणे पदोन्नती मिळवण्यासाठीही टीईटी आवश्यक आहे. निवृत्तीचे वय जवळ आलेल्या शिक्षकांना टीईटी सक्तीची नाही. मात्र टीईटी उत्तीर्ण नसलेल्या शिक्षकांची पदोन्नती रोखली जाणार आहे.

राज्यातील प्राथमिक शिक्षकांना आधीच अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. शिक्षकांची संख्या कमी असल्यामुळे एकेका शिक्षकाला क्षमतेहून अधिक वर्ग सांभाळावे लागत आहेत. त्याचा परीणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत आहे. दुसरीकडे राष्ट्रीय कर्तव्याच्या नावाखाली निवडणूकीतील मतदान प्रक्रिया इतर शासकीय योजनांची अंमलबजावणी यामध्येही शिक्षकांना सक्तीने सहभागी करून घेतले जाते. यामुळे शिक्षकांच्या कामकाजावर परीणाम होत आहे. अशातच ही अत्यंत कठीण असलेली टीईटी परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागणार आहे

**सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय दुर्दैवी आणि अन्यायकारक आहे. पदोन्नती हा शिक्षकांचा कायद्याने मिळालेला अधिकार आहे. तो रोखणे गैर आहे. निवृत्तीला आलेल्या शिक्षकाने आता टीईटी परीक्षा द्यायची का आता या निर्णया विरोधात राज्यातील सर्व शिक्षक संघटना एकवटल्या आहेत. याबाबत पुनर्विचार याचिका दाखल करावी अशी विनंती आम्ही शासनाला करणार आहोत.**

**-राजेश सुर्वे, राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, प्राथमिक विभाग**

## पत्नीपीडित पुरुषांचा राज्यस्तरीय मेळावा

**मुंबई : प्रतिनिधी**

आयुष्याचा आधारवड मानलेल्या संसारातच अन्यायाचा सामना करताना अनेक पुरुष मानसिक, सामाजिक आणि कायदेशीर आघातांना तोंड देत आहेत. या वेदनेला आवाज देण्यासाठी पत्नीपीडित पुरुषांचा राज्यस्तरीय मेळावा नुकताच पार पडला.

या मेळाव्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या पुरुषांनी आपले संघर्षमय अनुभव मांडले. काही पुरुषांचे डोळे त्यांच्या अन्यायाची कहाणी सांगत होते, तर काहींच्या आवाजात आर्त वेदना स्पष्ट जाणवत होती. संसार वाचवण्यासाठी प्रयत्न करतानाही खोट्या गुन्ह्यांचे खापर फोडले गेले, पोटगीच्या जाचक अटींनी उराशी घाव बसले, मानसिक छळाचा कहर झाला आहे. अशी जिव्हारी लागणारी कहाणी अनेक पुरुषांनी यावेळी मांडली.

या वेळी पत्नीपीडित पुरुष हक्क संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कायदेशीर मार्गदर्शनासह मानसिक आधार दिला आणि न्याय मिळेपर्यंत एकजुटीने लढा देऊया अशी भावनिक हाक दिली. सोडवण्यासाठी वेगवेगळ्या समित्या स्थापन करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

# रायगड जिल्हा सरकारी कार्डियाक मशिनला भाजपकडून नवी बॅटरी

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा सरकारी रुग्णालयातील काही दिवसांपासून बंद पडलेल्या कार्डियाक मशिनला अखेर नवी बॅटरी मिळाली असून ही बॅटरी भाजपच्या वतीने बसवण्यात आली. त्यामुळे तातडीच्या हृदयविकाराच्या रुग्णांवर उपचार सुरू ठेवण्यास मोठी मदत होणार आहे.

यावेळी ॲडिशनल सिव्हील सर्जन शितल, भाजपचे नेते ॲड. आस्वाद पाटील, ॲड. महेश मोहिते, ॲड. मनोज ओव्हाळ, युवा तालुकाध्यक्ष रोशन भगत तसेच भाजपचे अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्डियाक मशिन सुरू करण्याबरोबरच रुग्णालयातील इतर तांत्रिक अडचणी, बंद पडलेली यंत्रसामग्री, तसेच रुग्णसेवेतील अडथळे या सगळ्या मुद्द्यांची माहिती भाजप पदाधिकाऱ्यांनी जिल्हा सिव्हिल सर्जन यांच्याशीही चर्चा केल्याची माहिती भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांनी दिली.

याशिवाय रुग्णसेवेशी संबंधित अन्य समस्या यावर चर्चा करण्यासाठी मंगळवारी सिव्हिल सर्जन व संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेवून चर्चा करणार असून यातून निश्चितच मार्ग निघेल. यासाठी सरकारीची जी काही मदत लागेल ते सरकारपर्यंत पोहोचवून प्रश्न माग लावण्याचा आमचा प्रयत्न राहील असेही मोहिते यांनी म्हटले आहे.

# नवी मुंबई भाजपतर्फे वृद्धाश्रमात अन्नदान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी, नवी मुंबईच्या वतीने शुक्रवारी नेरुळ सेक्टर १० येथील मातृसदन या जेष्ठ महिलांच्या वृद्धाश्रमात राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने केक कापण्यात येऊन सर्वांना संपूर्ण एकदिवसाचे अन्नदान करण्यात आले. यावेळी या वृद्धाश्रमातील सर्व जेष्ठ मातांचा व या संस्थेच्या कार्यकारी मंडळींचा सन्मान माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत व भाजपा युवानेते निशांत भगत यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह केला.

तसेच सानपाडा पामबीच विभागातील तीर्थरूप शारदामाई धर्माधिकारी उद्यानातील विरंगुळा केंद्रात कॅरम स्पर्धेचे उदघाटन निशांत भगत व सोनखार जेष्ठ नागरीक संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. येथीलच माजी नगरसेविका फशीबाई करसन भगत यांच्या जनसंपर्क कार्यालयात जेष्ठ नागरिकांसाठी आयुष्यमान भारत योजनेच्या नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नवी मुंबई मनपा माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या नेतृत्वाखाली युवा नेते निशांत भगत माजी नगरसेविका वैजयंती भगत, रूपाली भगत, संदीप भगत यांनी यशस्वी केले.

# राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत आदिती पवारचे सुयश

**मुरुड : प्रतिनिधी**

अहिल्यानगरच्या मंथन वेल्फेअर फौंडेशनच्या वतीने २ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात आलेल्या मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान परीक्षेत नांदगावच्या कु. आदिती राजेंद्र पवार धवल यश प्राप्त केले आहे. रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा नांदगाव नं.१ या शाळेतून तिने इयत्ता पाचवीच्या वर्गातून ही परीक्षा दिली होती.या परीक्षेत तिला भाषा-१व गणित विषयात १५० पैकी ११० गुण, भाषा-२व बुध्दीमत्ता विषयात १५० पैकी ११६ असे एकूण ७५ .३३% गुण मिळाले आहेत.त्यामुळे तिला केंद्रात दुसरा, रायगड जिल्ह्यात २९वा तर राज्यात ३७ वा क्रमांक प्राप्त झाला आहे.आदितीने इयत्ता सहावीच्या वर्गासाठी येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगरमध्ये प्रवेश घेतला आहे. आदितीच्या या यशाबद्दल नांदगाव मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता खानावकर, शिक्षक रुपेश बांद्रे, हेमंत नांदगावकर, राठोड सर , ग्रामशिक्षण समिती प्रमुख वृषाली जोशी , हायस्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतिक पेडणेकर व सर्व शिक्षक शिक्षिकांनी तिचे अभिनंदन केले



पान १ वरुन

## कर्मयोगी भावनेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी कार्यरत -आमदार प्रशांत ठाकूर

युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, कामोठे मंडळाचे माजी अध्यक्ष रवी जोशी, माजी नगरसेवक अजय बहिरा, मुकीद काझी, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, सारिका भगत, सुरेखा मोहोकर, नीता माळी, सरचिटणीस रूपेश नागवेकर, उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, प्रभाग १९ अध्यक्ष पवन सोनी, रामेश्वर आंग्रे, हिमेश बहिरा, युवानेते प्रतीक बहिरा, सुमित दसवते, संतोष वर्तले, भावेश शिंदे, ब्रिजेश बहिरा, संजीवनी खिलारे यांच्यासह पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

या मोफत शोचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी सायंकाळी ६.३० वाजता ओरियन मॉलमध्ये उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# रायगडातील तीन शिक्षकांना राज्य गुणगौरव पुरस्कार जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने २०२४ - २५ या शैक्षणिक वर्षासाठीचे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार गुरूवारी जाहीर केले. राज्यभरातून १०९ शिक्षकांची यासाठी निवड करण्यात आली आहे. यात रायगड जिल्हयातील मानसी भोसले, सतीश घावट, अपूर्वा जंगम हे तीन शिक्षक राज्य पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

प्राथमिक विभागातून पनवेल तालुक्यातील सांगुर्ली प्राथमिक शाळेच्या शिक्षिका मानसी भोसले यांची राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी निवड झाली आहे. विविध शैक्षणिक उपक्रमांतून पाच वर्षांत शाळेची पटसंख्या ४२ टक्क्यांनी वाढवली. समाज माध्यमांचा वापर करून शैक्षणिक साहित्य निर्मिती करत नवोपक्रम स्पर्धेत जिल्हास्तरावर तिसरा क्रमांक मिळवला. दानशूर व्यक्ती आणि सामाजिक संस्था यांच्या मदतीतून शाळेत भौतिक सुविधा आणि विद्यार्थांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात मानसी भोसले यांचा मोलाचा सहभाग राहिला आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये यश मिळवले आहे.

आदिवासी विभागासाठी असलेल्या पुरस्कारासाठी कर्जत तालुक्यातील झुगेरवाडी येथील जिल्हा परीषदेच्या उच्च प्राथमिक शाळेचे शिक्षक सतीश घावट यांची निवड झाली आहे. शिष्यवृत्ती तसेच स्पर्धा परीक्षेत या शाळेचे विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले आहेत. विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थी प्रतिकृती मार्गदर्शक म्हणून त्यांनी राज्यस्तरावर प्रतिनिधीत्व केले आहे. कोरोना काळात व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत सहभाग घेतला. या शाळेस मुख्यमंत्री सुंदर शाळा स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला आहे. घावट यांनी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करतानाच कृतीयुक्त शिक्षणावर भर दिला.

कशेणे येथील जिल्हा परीषद शाळेच्या शिक्षिका अपूर्वा जंगम यांना सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार जाहीर झाला आहे. गेल्यावर्षी राज्य रंगोत्सवात त्यांच्या ८ विद्यार्थ्यांना राज्यस्तरावर सादरीकरणाची संधी मिळाली. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परीषदेतील अभ्यासक्रम निर्मितीत सहभाग, इंग्रजी बीजकोष निर्मितीत सहभाग, बालभारती वेबसाईटवर शैक्षणिक व्हिडिओ आहेत. निपुण भारत उपक्रमांतील स्पर्धांमध्ये त्यांनी यश संपादन केले आहे. २२ सप्टेंबर रोजी मुंबईत पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

# 'मानवी तस्करी रोखण्यासाठी शासन आणि सामाजिक स्तरावर जागृती आवश्यक'

**अलिबाग : प्रतिनिधी**

गोव्यात मानवी तस्करीच्या माध्यमातून नेण्यात येणाऱ्या ३० टक्के मुली या महाराष्ट्रातील असतात, त्यामुळे ही मानवी तस्करी रोखण्यासाठी शासनस्तरावर तसेच सामाजिक स्तरावर याबाबत जागृती निर्माण करणे आवश्यक असल्याचे मत मनोविकार तज्ञ डॉ रुपेश पाटकर यांनी व्यक्त केले.

ते अलिबाग येथे अन्याय रहित जिंदगी या संस्थेतर्फे आयोजित मानवी तस्करी रोखण्या संदर्भातील आव्हाने या विषयांवरील चर्चासत्रात बोलत होते. गोव्यात वेश्याव्यवसायात फसवून आणलेल्या मुली आणि महिलांची पोलिसांच्या सहकार्याने सुटका करून, त्यांचे पुनर्वसन करणे हे कार्य अन्याय रहित जिंदगी संस्थेच्या माध्यमातून दीर्घकाळ सुरु आहे. या संस्थेनी केलेल्या सर्वेक्षणात मानवी तस्करी व्दारे गोव्यात येणाऱ्या तीस टक्के मुली महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ही मानवी तस्करी रोखणे हे सर्वात मोठे आव्हान असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ही बाब लक्षात घेऊन महाराष्ट्रातील विवीध जिल्ह्यात जाऊन मानवी तस्करी रोखण्यासाठी जनजागृती करण्याचे काम हाती घेतल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.




यावेळी अरुण पांडे यांनी स्वानुभवाचे आधारे गोव्यातील वेश्याव्यवसाय कसा वाढला, त्याचे स्वरूप काळानुसार कसे बदलले, हे सविस्तरपणे मांडले. आता वेश्यांची वेगळी वस्ती कोठेच दिसत नाही. कारण पूर्वीचा ऑफलाइन वेश्याव्यवसाय आता ऑनलाइन झाला आहे. संबंधित सर्वांकडून वेश्याव्यवसायात आणलेल्या स्त्रियांचे सर्वांगीण शोषण कसे होते, ते त्यांनी स्पष्ट केले. या व्यवसायातून सुटका झालेल्या स्त्रियांचे त्यांच्या जिल्ह्यात पुनर्वसन करण्यात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी संबंधित शासकीय अधिकारी, समाजसेवी संस्था यांचे कार्य आणि त्यांच्यातील समन्वय महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर जिल्हा महिला आणि बाल कल्याण अधिकारी, मोहिनी रानडे यांनी शासकीय योजनांची आणि त्यामधील अडचणींची माहिती दिली. पोलीस अधिकारी वाघमोडे यांनी हा प्रश्न सोडवण्यातील विविध अडचणी आपण भावी काळात पूर्णपणे सोडवू असे सांगितले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रतिनिधी ॲड. कामते, ॲड.नागावकर यांनी विविध शासकीय योजनांची माहिती दिली. जगदीश भगत यांनी लैंगिक हिंसेला बळी पडलेल्या महिलांना कौशल्य विकास कार्यक्रमातून कशी मदत करता येईल, हे स्पष्ट केले. वैशाली पाटील,पेण यांनी आपल्या सामाजिक कार्यातील प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे, या प्रश्नाचे गांभीर्य आपल्या जिल्ह्यात चैनीसाठी, सुटीत येणाऱ्या प्रवाशांमुळे कसे वाढत चालले आहे, हे स्पष्ट केले.

## कर्जत चिंचवली येथे महसूल महाराजस्व अभियान

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील महसूल विभागातील छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान चिंचवली महसूल विभागात सुरू करण्यात आले. या अभियानामध्ये चिंचवली परिसरातील स्थानिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. चिंचवली क्षेत्रीय कार्यालयाकडून जनतेस सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी २०२५ - २६ या वर्षात मंडळ स्तरावर अभियान करण्यात आले होते.

## दुखवटा

**लक्ष्मीबाई वारदे**

**पनवेल :** खानाव येथील लक्ष्मीबाई वारदे यांचे बुधवारी दि १७ निधन झाले मृत्यू समयी ते ९० वर्षाचे होते त्यांच्या पश्चात दोन मुलगे आणि दोन मुली नातवंडे असा परिवार आहे कै लक्ष्मीबाई वारदे यांची दंश क्रिया विधी शुक्रवार दिनांक २६ रोजी श्री क्षेत्र उदर रामेश्वर आहे तर उत्तर कार्य सोमवार दि २९ येथे राहत्या घरी खानाव येथे होणार आहे



# कोरोनानंतर आरोग्याबाबत सजगता

## पनवेल मनपाच्या केंद्रांबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून समाधान व्यक्त

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रत्येकाला कारोनानंतर आपल्या आरोग्याचे महत्व समजले आहे. कोरोना काळानंतर आरोग्याच्या बाबतीत खूप मोठे परिवर्तन झाले आहे. नागरिकांचे आरोग्य सदृढ रहावे यादृष्टीने सज्ज रहाण्यासाठी महापालिकेने महत्वाची पाऊले उचलली आहेत. एमएमआरडीए क्षेत्रात सगळ्यात जास्त नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र उभारल्याबद्दल महापालिकेचे अभिनंदन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.



स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष राष्ट्रीय अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान पनवेल महानगरपालिकेच्यावतीने पालिका कार्यक्षेत्रातील सर्व २६ आरोग्य केंद्रांतर्गत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत पनवेल महापालिका आणि पनवेल तालुका प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल शहरातील भाजीविक्रेत्यांसाठी शुक्रवारी (दि.१९) पनवेल शहरात भाजी मार्केटमधील नागरिकांसाठी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

या वेळी आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, मा. नगरसेविका सौ दर्शना भोईर, शिवसेना पनवेल महानगर प्रमुख ॲड. प्रथमेश सोमण, अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त मंगला माळवे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे, तसेच रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, सर्व वैद्यकिय अधिकारी, पालिका अधिकारी, तालुका प्रेस क्लबचे सदस्य यांची प्रमुख उपस्थित होते.

या वेळी पालिकेच्या वतीने महिलांच्या विविध आरोग्य चाचण्याचे स्टॉल्स उभारण्यात आले होते. याबरोबरच २ ऑक्टोबरपर्यंत महापालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत होणऱ्या या आरोग्य शिबिरांचा महापालिका क्षेत्रातील महिलांनी व बालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. तसेच या आरोग्य शिबीरामाध्यमातून आभा कार्ड व आयुष्यमान कार्ड नागरिकांनी काढण्याचे आवाहन मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी आपल्या प्रास्ताविकात केले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते क्षयरूग्णांना धान्याच्या किटचे वाटप करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी क्षयरूग्णांना मदत करत निक्षय मित्र झाल्याबद्दल पालिकेच्यावतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

या आरोग्य शिबिरासाठी डॉ. रेहाना मुजावर, माताबाल संगोपन अधिकारी डॉ.गणेश नायर, डॉ.मनिषा चांडक, डॉ.भक्तराज भुईटे, डॉ.सुरेश पंडित, क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड, साथरोग अधिकारी डॉ. आकाश ठसाळ यांचे सहकार्य लाभले.

# सोने व्यापाऱ्याचा चालकच ठरला लुटारू

## ५.९० लाखांचे दागिने, रोख रक्कम लुटल्याचा केला बनाव

**पनवेल : वार्ताहर**

खांदा कॉलनी येथील रेल्वे ब्रीजवर दागिने व रोख रक्कम लुटीची घटना बनाव असल्याचे उघडकीस आले आहे. बी.बी.बांठिया ज्वेलर्स कंपनीत चालक म्हणुन काम करणाऱ्या शैलेश कांबळे (वय३८) या कर्मचाऱ्यानेच पाच लाख ९० हजार रुपये किंमतीचे दागिने व रोख रक्कमेचा अपहार करून त्याचा बनाव रचल्याचे उघडकीस आले आहे. त्यानुसार गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पथकाने या आरोपीला अटक केली आहे. तसेच त्याच्याकडुन दागिने व रोख रक्कम हस्तगत केले आहेत.

या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी शैलेश कांबळे या पनवेलमधील बी.बी. बांठिया ज्वेलर्स या सोन्याच्या व्यापाऱ्याकडे चालक म्हणुन काम करत होता. त्याला खांदा कॉलनी व कळंबोली येथील कंपनीच्या कार्यालयातून दागिने व रोख रक्कम घेऊन आणण्यासाठी पाठवण्यात आले होते. त्यानुसार शैलेश याने पाच लाख ९० हजार रुपये किंमतीचे दागिने व रोख रक्कम घेतल्यानंतर त्याने दागिने व रोख रक्कम आपल्या इलेक्ट्रीक टिव्हीएस आयक्युबच्या डिकीमध्ये लपवून ठेवले. त्यानंतर त्याने सायन-पनवेल मार्गावरील खांदा कॉलनी रेल्वे ब्रीजवर दुचाकीवरून हेल्मेट घालुन आलेल्या दोघा लुटारुंनी त्याला चाकुचा धाक दाखवून त्याच्याजवळ असलेले दागिने व रोख रक्कम लुटल्याचा बनाव रचला होता.

याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर खांदेश्वर पोलिसांसह गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पथकाकडुन या गुह्याचा समांतर तपास करण्यात येत होता.

सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक निरीक्षक पवन नांद्रे, उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे व त्यांच्या पथकाने केलेल्या तपासात शैलेश कांबळे याने सांगितलेल्या घटनेत अनेक विसंगती आढळुन आल्या. घटनेच्या ठिकाणीही संशयित व्यक्ती आढळुन आल्या नाहीत. त्यामुळे शैलेश कांबळे याच्यावर संशय बळावल्याने गुन्हे शाखेने सखोल चौकशी केली. त्यानंतर त्यानेच जबरी चोरीचा बनाव रचल्याचे कबूल करून स्कुटीच्या डिकीमध्ये लपवून ठेवलेले दागिने पोलिसांच्या स्वाधीन केले. त्यानंतर त्याला अटक झाली.

# खारघरमध्ये सम-विषम पार्किंग लागू

**पनवेल : वार्ताहर**

खारघर शहरातील मुख्य रस्त्यावर काही भागांत सम-विषम पार्किंग करण्यावा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे सेक्टर १३, १९ ते २१ मध्ये होणारी वाहतूक कोंडी टाळणार आहे.

खारघरमधील गोखले शाळेकडून शिल्प चौकाकडे जाणारा मुख्य रस्ता, सेक्टर १९ इनटॉप सोसायटी ते पाटील रेसिडेन्सीकडे जाणारा रस्ता, सेक्टर २०मधील केसर गार्डन सोसायटी, शुभहोम सोसायटी ते द्विन्स टॉवरकडे जाणारा रस्ता आणि सेक्टर २१मधील उन्नती सोसायटी ते नवजीवन हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रस्त्यावर खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जमील शेख यांनी सम-विषम पार्किंगसाठी अधिसूचना जारी केली. खारघरमध्ये वाहतुकीस अडथळा ठरत असल्याने वाहतूक विभागाला याबाबतचे पत्र दिल्याचे भाजपचे रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांनी सांगितले.

# जबरी चोरी करणारे त्रिकूट गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

जबरी चोरी करणाऱ्या तिघा जणांच्या एका टोळीस पनवेल गुन्हेशाखा कक्ष ३ पथकाने जेरबंद करून या टोळीकडून २ गुन्हे उघडकीस आणण्याची कामगिरी केली आहे. प्रथमेश तरे (२४, रा. विचुंबे), समीर पेडणेकर (२६, रा.विहिघर) व साहिल खैरे (२३, रा. विचुंबे) अशी याप्रकरणी अटक केलेल्या तिघांची नावे असून, या तिघांना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

कळंबोली पोलीस ठाणे हद्दीमधील कळंबोली सिग्नल याठिकाणी स्कुटी वरून आलेल्या तीन व्यक्तींनी सिमेंट बल्कर चालकास वस्तरा दाखवून त्याचेकडे पैशांची मागणी करून त्याच्याकडील वन प्लस कंपनीचा मोबाईल फोन जबरीने चोरी करण्याची घटना घडली होती. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार गुन्हे शाखा कक्ष ०३ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते यांच्या नेतृत्वात सपोनि पवन नांद्रे, पोउपनि अभयसिंह शिंदे, पोहवा. रमेश शिंदे, प्रमोद राजपुत, निलेश पाटील व इतर आदींच्या पथकाने सदर गुन्हयाचे तांत्रिक तपास, सीसीटिव्ही फुटेज, गोपनिय बातमीदार व मानवी कौशल्याचा वापर करून हा गुन्हा उघडकीस आणत उपरोक्त तीन जणांना बेड्या ठोकल्या आहेत.

# धोदाणी येथे रस्त्यांचे सर्वेक्षण, वृक्षारोपण

## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी समर्पित भावनेने कार्य करणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे पंत्रप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत सेवा पंधरवडा राविण्यात येत आहे. या काळात महसूल विभागाच्या वतीने विविध शिबिरे तसेच उपक्रम रबवण्यात येत आहेत. त्यानुसार छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान पनवेल तालुक्यात राबवण्यात येणार आहेत.



या उपक्रम अंतर्गत पनवेल तालुक्यातील धोदाणी येथे ग्रामीण गावातील रस्ते, गाडी मार्ग, पाय रस्ता, शेत पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण तसेच वृक्षारोपण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी झाले. या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी पवन चांडक, अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, नेरे मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, माजी पंचायत समिती सदस्य राज पाटील, विहीघर विभागीय अध्यक्ष सुनिल पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, सरपंच शांताराम चौधरी, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, माजी सरपंच राजा भोईर यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# हिंदी दिवसानिमित्त वादविवाद स्पर्धेत बीसीटी लॉ कॉलेजची चमकदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदी दिवसानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, पनवेल यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय वादविवाद स्पर्धेत भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) लॉ कॉलेजने संस्थेचे नाव उंचावले आहे. बीएएलएलबीच्या दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थिनी श्रुती चौबे हिने प्रथम क्रमांक पटकावला.




प्राचार्य डॉ. सानवी देशमुख आणि बीएएलएलबी समन्वयक सहाय्यक प्रा. धनश्री कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी झाली. विद्यार्थ्यांना सहाय्यक प्रा. राघव शर्मा यांचे मार्गदर्शन मिळाले आणि डिबेट सोसायटीच्या प्रभारी सहाय्यक प्रा. ऐश्वर्या पाटोळे यांच्या पाठिंब्याचा आणि समन्वयाचा फायदा झाला. डिबेट सोसायटी कमिटीचे विद्यार्थी प्रतिनिधी यश कांबळी यांच्या प्रयत्नांचेही सहभागींना सतत पाठिंबा दिल्याबद्दल कौतुक करण्यात आले.

या स्पर्धेत देशभरातील काही उत्कृष्ट तरुण वादविवादकांचा सहभाग होता, ज्यामुळे टीकात्मक विचारसरणी, वक्तृत्व आणि हिंदीवर प्रभुत्व दाखवण्यासाठी एक व्यासपीठ मिळाले. श्रुतीने तिच्या संरचित युक्तिवादाने, स्पष्टतेने आणि आकर्षक सादरीकरणाने तज्ज्ञ परीक्षक प्रभावित केले आणि तिला अव्वल स्थान मिळवून दिले.

बीएएलएलबीच्या दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थिनी सुश्री रिचा प्रिया यांनीही समर्पण आणि उत्साहाने महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले आणि संस्थेच्या कामगिरीत प्रशंसनीय योगदान दिले.

कॉलेज व्यवस्थापनाने श्रुती आणि रिचाचे अभिनंदन केले आणि त्यांना भविष्यातील प्रयत्नांमध्ये यश मिळावे अशी शुभेच्छा दिल्या. हा विजय भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ च्या विद्यार्थ्यांमध्ये समग्र विकास, नेतृत्व आणि उत्कृष्टता जोपासण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करतो.

# नवीन पनवेल वाहतूक शाखेतर्फे हेल्मेट वाटप

**पनवेल : वार्ताहर, कळंबोली : बातमीदार**

रस्ते सुरक्षेच्या अनुषंगाने पटेल इंजिनीअरिंग कंपनी, खारपाडा यांच्या सौजन्याने नवी पनवेल वाहतूक शाखेत सुरक्षित प्रवासाची हमी देणारे वाहतूक पोलीस अंमलदार आणि नागरिकांना हेल्मेट वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला नवी पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत खराटे यांनी उपस्थित राहून वाहतुकीच्या नियमांचे पालन व सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी नागरिकांना अपघात टाळण्यासाठी हेल्मेटचा वापर अनिवार्य असल्याचे सांगितले आणि आपली सुरक्षितता आपल्या हातात आहे असा संदेश दिला. यावेळी पटेल इंजिनीअरिंग कंपनीचे प्रोजेक्ट हेड श्री. कुलकर्णी, डेप्युटी हेड सेनगुप्ता यांच्यासह कंपनीचा स्टाफ, वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते. हेल्मेट वाटप कार्यक्रमामुळे नागरिकांमध्ये रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती झाली असून, हा उपक्रम समाजात एक आदर्श ठरत आहे.




# वनवासी कल्याण आश्रमचा हितचिंतक मेळावा उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या ज्येष्ठ नागरीक संघाच्या सभागृहात ऋवनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र या संस्थेचाहितचिंतक मेळावा उत्साहात झाला. या मेळाव्याला युट्यूब चॅनलचे संपादक सुशील कुळकर्णी प्रमुख वक्ता लाभले होते. या कार्यक्रमाला पनवेलमधील अनेक मान्यवर उपस्थित होते.



शहर अध्यक्ष अश्वीनी मुळे यांनी प्रास्ताविक केले. कुलाबा जिल्हाध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी वनवासी कल्याण आश्रम संस्था पनवेलनजीक करत असलेल्या कार्याचा आढावा सादर केला. त्यानंतर एकनाथ वाघे व सुदाम पवार या चिंचवलीच्या दोन माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

सुशील कुळकर्णी यांनी तू मै एक रक्त या घोषवाक्याचा व पौराणिक-ऐतिहासिक संदर्भाचा आधार घेत, वनवासी क्षेत्रातील नागरी समाजाच्या कार्याची आवश्यकता आणी निकड, अत्यंत प्रभावीपणे सोप्या भाषेत विषद केली.

हा मेळावा उपस्थितांकरता एक वेगळ दृष्टीकोन देणारा अनुभव होता. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# गव्हाण विद्यालयात चेअरमन अरुणशेठ भगत यांची मुलाखत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागातील उपक्रमशील विद्यालय अशी ओळख असणाऱ्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये 'एक मुलाखत - यशस्वी माजी विद्यार्थ्यांची' या नाविन्यपूर्ण नवोक्रमाला या शैक्षणिक वर्षापासून प्रारंभ झाला असून संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रेरणेतून आणि प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या संकल्पनेतून साकारत असणाऱ्या ह्या नाविन्यपूर्ण उपक्रम मालिकेच्या दुसऱ्या भागाचे चित्रीकरण विद्यालयाच्या प्रांगणात शुक्रवारी (दि.१९) पूर्ण करण्यात आले.



विद्यालयाचे माजी विद्यार्थी व स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य, सामाजिक, शैक्षणिक राजकीय व उद्योग क्षेत्रातील बहुआयामी व्यक्तिमत्व अरुणशेठ भगत यांच्या मुलाखतीने या विशेष उपक्रमाच्या मालिकेचे दुसरे पुष्प गुंफले. या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख व सदानंद देशमुख,विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, संस्थेचे जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे आदी उपस्थित होते.

### विजय घरत यांच्याकडून विद्यालयास कॅमेरा भेट

***डी.जे.आय.क्शन-४ हा चाळीस हजार रूपये किंमतीचा अत्याधुनिक कॅमेरा विद्यालयात सप्रेम भेट दिला. त्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचे अभिनंदनीय आभार व्यक्त करण्यात आले. त्यांनी विद्यालयास सप्रेम भेट दिलेल्या या अत्याधुनिक कॅमेऱ्याच्या सहाय्याने 'एक मुलाखत - यशस्वी माजी विद्यार्थ्यांची' या मालिकेतील दुसऱ्या भागाचे चित्रीकरण यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले.***

माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी त्यांची मुलाखत घेतली. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांचे संहिता लेखन व दिग्दर्शन, दर्शना माळी यांचे सहाय्य तसेच विशांत ठाकूर व प्रतिज्ञा घरत यांचे तंत्रसहाय्य व कलाशिक्षक गणेश भोईर यांचे समर्पक व आकर्षक फलक लेखन यामुळे हे चित्रिकरण प्रभावी झाले.

अरूणशेठ भगत यांना सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व उद्योगक्षेत्रातील प्रेरणा कोणाकडून मिळाली, कामाच्या व्यग्रतेतून कुटुंबासाठी कसा वेळ देता, प्रशासकीय अनुभव, समाजोपयोगी कामे, तरूणांना संदेश, शालेय जीवनातील अनुभवावर आधारीत वैविध्यपूर्ण व कुतुहलपूर्ण प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारले.

मुलाखतकार विद्यार्थ्यांमध्ये आरोही नाळे, स्मीत मोकल, कपिल सोनकांबळे, गीता बट्ुळे, सात्विक भोईर, सिद्धांती सुतार, साईशा घोलप व प्रज्वल कोरेकर यांचा समावेश होता. त्यांनी अत्यंत आत्मविश्वासपूर्ण मुलाखत घेतली. त्याबद्दल अरुणशेठ भगत यांनी त्यांचे कौतुक करून उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

# शब्दांच्या जादूने रंगली स्पर्धा

## शाळा अंतर्गत फेरीतील विद्यार्थी सन्मानित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक : वक्तृत्व स्पर्धा २०२५ अंतर्गत शाळाअंतर्गत फेरीचा पारितोषिक वितरण सोहळा सी. के. ठाकूर विद्यालय, नवीन पनवेल (मराठी माध्यम) येथे मोठ्या उत्साहात झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी महापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका राजेश्री वावेकर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, मुख्याध्यापक सुभाष मानकर, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, अक्षय सिंग, मयूर कदम, श्रावण घोसाळकर आदी मान्यवर उपस्थित होते.



या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सामाजिक प्रश्न, पर्यावरण संवर्धन, स्वच्छ भारत, प्लास्टिकमुक्त भारत, शिक्षणाचे महत्त्व, वेळेचे व्यवस्थापन, कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या विविध विषयांवर प्रभावी विचार मांडले. वक्तृत्वातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि नेतृत्वगुण स्पष्ट दिसून आले. या फेरीत एकूण ३० विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. त्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या विद्यार्थ्यांची निवड पुढील आंतरशालेय फेरीसाठी करण्यात आली आहे.

कार्यक्रमादरम्यान विद्यालयाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्पर्धा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांनी विद्यार्थ्यांना विचार व्यक्त करण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे, असे त्यांनी मत व्यक्त केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भविष्यातील सक्षम वक्ते, नेते आणि आत्मविश्वासी नागरिक बनण्याची प्रेरणा मिळाली.

## संपादकीय

# पुन्हा एकदा कांगावा

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी ज्या तऱ्हेने कांगावा करत निवडणूक आयोगावर बिनबुडाचे आरोप करतात, त्यातून त्यांना माध्यमात प्रसिद्धी मिळेल, राजकीय लाभ मिळाल्यासारखे वाटेल. परंतु पुन्हा पुन्हा अशा खोट्या आरोपांतून निवडणूक आयोगासारख्या यंत्रणेच्या विश्वासार्हतेविषयी प्रश्न उपस्थित करणे देशातील लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहे.

**विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यापूर्वी कथित व्होटचोरीसंबंधी आरोप केले होते तेव्हाच निवडणूक आयोगाने त्यांना आरोपांसंबंधात प्रतिज्ञापत्र द्या, अन्यथा माफी मागा असा इशारा दिला होता. सात दिवसांत प्रतिज्ञापत्र सादर न केल्यास आरोप निराधार मानण्यात येतील असेही तेव्हा मुख्य निवडणूक आयुक्तांनी म्हटले होते. तरीही राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा निवडणूक आयोगालाच लक्ष्य करत, मतदारांची नावे सॉफ्टवेअरद्वारे मतदारयादीतून परस्पर वगळल्याचा नवा आरोप गुरुवारी केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे मतचोरांना संरक्षण देत असून ते लोकशाहीचे मारेकरी आहेत अशी भाषा वापरणे कितपत योग्य आहे याचा राहुल गांधी यांनी विचार करायला हवा. याखेपेला राहुल गांधी यांनी कर्नाटकमधील आलंद मतदारसंघातील मतदारांची नावे सॉफ्टवेअरद्वारे वगळल्याचे कथित पुरावे सादर केले. महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा विधानसभा मतदारसंघात त्याच पद्धतीने नावे जोडण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. 'हायड्रोजन बॉम्ब'च्या डरकाळ्या फोडणाऱ्या राहुल यांनी यावेळी 'हायड्रोजन बॉम्ब' नसून तो नंतर आणला जाईल अशी सारवासारव पत्रकार परिषदेत केल्याने तर त्यांचे अधिकच हसे झाले. ठोस पुरावा हाती नसताना आपण खूप मोठा काही तरी शोध लावल्याचा आव याही वेळी राहुल गांधी यांनी आणला. राहुल गांधी हायड्रोजन बॉम्ब फोडणार म्हणत होते. पण ते लवंगी फटाकाही फोडू शकले नाहीत. त्यांनी फुसका बार लावला आहे अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची खिल्ली उडवली. राहुल गांधी हे 'सिरियल लायर' (खोटारडे) आहेत. रोज खोटे बोलायचे आणि गोबेल्स नीती वापरायची अशी टीकाही फडणवीस यांनी यावेळी केली. एखादी खोटी गोष्ट १०० वेळा रेटून सांगितली की ती खरी वाटायला लागते यालाच गोबेल्स नीती म्हणतात. राहुल गांधी सध्या या नीतीचा वापर करून निवडणूक आयोगाला लक्ष्य करीत आहेत का असा प्रश्न पडतो. इतक्या वेळा निवडणूक आयोगाने त्यांना नोटीस दिली. परंतु ते एकही पुरावा आजपर्यंत देऊ शकले नाहीत असेही फडणवीस यांनी सांगितले. राहुल गांधी कितीही खोटे बोलले तरी जनतेचा त्यांच्यावर विश्वास नाही. आतापर्यंत महाराष्ट्राच्या संदर्भात त्यांनी केलेली सारी वक्तव्ये खोटी निघाली आहेत. त्यांच्या खोट्या आरोपांचे पुरावे निवडणूक आयोगाने दिल्याने ते तोंडावर आपटले आहेत अशा शब्दांत फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या आरोपांचा समाचार घेतला. महाराष्ट्रातील पराभव राहुल गांधी यांना जिव्हारी लागला आहे. जनतेने त्यांना जो झटका दिला, त्यातून ते अजुनही बाहेर येऊ शकलेले नाहीत अशी मार्मिक टिप्पणीही फडणवीस यांनी यासंदर्भात केली. प्रत्येक निवडणुकीनंतर मतमोजणीवर शंका घेणे, लोकशाही संस्थांवर बिनबुडाचे आरोप करणे आणि फुटकळ गोष्टींना आपल्या हाती खूप मोठे काही लागले आहे असा थाटात सादर करणे हे राहुल गांधी यांनी आता थांबवायला हवे. त्याऐवजी ते जनतेत जाऊन काम करतील तर कदाचित त्यांना जनतेचे थोडेफार समर्थन लाभू शकेल.**

# भाजपचे क्रियाशील प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण



भाजप हीच माझी ओळख आहे, या ओळखीतूनच मी घडलो आहे. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना गेल्या २५ वर्षांमध्ये हा प्रदीर्घ प्रवास घडला, तो सदैव सोबत असणारे भाजप वरिष्ठ यांचेमुळेच घडला असे म्हणणारे भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा आज वाढदिवस. त्यांचा जन्म २० सप्टेंबर १९७० रोजी मुंबई येथे झाला. त्यांनी शालेय शिक्षण मुंबई येथून पूर्ण केले. बारावीचे शिक्षण पूर्ण केले आणि पुढील शिक्षण यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून घेतले.

२००२मध्ये रवींद्र चव्हाण यांची भारतीय जनता युवा मोर्चाचे कल्याण उपविभाग अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. २००५मध्ये ते कल्याण-डोंबिवली महानगरपालिका येथे सदस्य म्हणून निवडून आले आणि डोंबिवली येथील सावरकर रोड वॉर्डचे प्रतिनिधित्व केले. २००७मध्ये ते कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष झाले. २००९मध्ये चव्हाण डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे पहिले सदस्य म्हणून निवडून आले. त्यांनी भारतीय जनता पक्ष युतीच्या तिकिटावर निवडणूक जिंकली.

२०१९च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत रवींद्र चव्हाण यांनी कोकण विभागात सर्वाधिक मते मिळवून विजय मिळवला. २०१६मध्ये त्यांची महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून नियुक्ती झाली, त्यांच्याकडे पोर्ट्स, माहिती तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण आणि अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांची जबाबदारी होती. १ फेब्रुवारी २०१८ रोजी त्यांना रायगड जिल्ह्याचे पालक मंत्री म्हणून नियुक्त केले.

भाजप-शिवसेना युती तुटल्यानंतर आणि महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यानंतर चव्हाण यांनी आमदार म्हणून कार्य सुरू ठेवते आणि जुलै २०२०मध्ये महाराष्ट्रातील भाजपचे सरचिटणीस म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. ११ जानेवारी २०२५ रोजी भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर ते प्रदेशाध्यक्ष झाले.

दरम्यान, २०२२ ते २०२४ या काळात ते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र शासनात कॅबिनेट मंत्री होते. त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळता) आणि अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची जबाबदारी सांभाळली. तसेच त्यांनी पालघर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे पालकमंत्री म्हणूनही कार्य केले.

डोंबिवली मतदारसंघात रवींद्र चव्हाण यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. गुढीपाडवा शोभायात्रेतील त्यांचा सहभाग असतो. चव्हाणांनी नगरसेवक असल्यापासून देशभक्ती, समाज प्रबोधनाचे विषय मांडण्यास सुरुवात केली होती. २०१० साली त्यांनी डोंबिवलीकर पुरस्कार देण्यास सुरूवात केली. विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या डोंबिवलीकरांना हा पुरस्कार दिला जातो. मतदारसंघात रोझ फेस्टिव्हल, मुलांसाठी किलबिल महोत्सव, कला क्रीडा महोत्सव, डोंबिवली रेल परिषदेचे आयोजन, डोंबिवलीकर संगीत महोत्सव असे उपक्रम त्यांनी राबवले आहेत. चव्हाण यांनी २०१४ साली डोंबिवलीकरांना फ्री वायफाय सुविधा सुरू केली होती. डोंबिवली विधानसभा मतदारसंघावर चव्हाण यांची पकड मजबूत असल्याचे दिसते.

सार्वजनिक बांधकाममंत्री म्हणून प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणाली (PMIS) सुरू केली. पारदर्शकता सुधारण्याची आणि प्रकल्प निरीक्षण सुव्यवस्थित करणे हे या प्रणालीचे उद्दिष्ट होते. कोकण रेल्वेच्या १२ स्थानकांसाठी सौंदर्याकरण आणि पायाभूत सुविधांचा विकास करण्याचा प्रकल्प सुरू केला. हे काम एक वर्षात पूर्ण केले. यामुळे कोकण क्षेत्रातील पर्यटनाला चालना मिळेल.

त्यांनी दीर्घकाळ रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्ग प्रकल्पातील समस्येवरही लक्ष दिले, त्यांच्या नेतृत्वाखाली, जमिनीच्या अधिग्रहणाच्या समस्यांचा निपटारा करण्यात आला आणि कोकणमधील जमीन देणाऱ्या रहिवाशांना नुकसानभरपाई देण्यात आली.

प्रदेश अध्यक्ष झाल्यावर बोलताना रवींद्र चव्हाण यांनी राष्ट्र प्रथम, त्यानंतर पक्ष आणि शेवटी स्वतःहा भारतीय जनता पक्ष परिवाराचा हा मंत्र मनात ठेवूनच आजवर राष्ट्रसेवेचा वसा जपत आलो आहे. पक्षाने आजवर ज्या ज्या जबाबदाऱ्या सोपवल्या, त्यातील प्रत्येक जबाबदारी सर्वतोपरी यशस्वीरित्या पार पाडली. देशातील गरीबांची निस्वार्थ सेवा करणे हाच माझ्या जीवनाचा प्रमुख उद्देश आहे, कारण मी स्वतः गरिबी अनुभवली आहे. यामुळेच आपलं सरकार त्यांना केंद्रस्थानी ठेवून सातत्याने नवीन योजना आखत असून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले आहे.

(साभार : इंटरनेट)

# अस्त...




संध्याकाळ झालीय. दिवसभर तळपणारा सूर्य हळूहळू शांत होऊ लागलाय. आभाळानंसुद्धा कात टाकलीय. दिवसभर प्रखरतेने डोळे दिपवणाऱ्या आभाळात निळा रंग चढल्याने शांत वाटू लागलंय. सूर्य अस्ताला जातोय तसतसं आभाळ सप्तरंगी झालंय. अखेर सूर्यास्त झाला. आवर्तनाच्या पोकळीत आता मिट्ट काळोख पसरलाय. एका क्षणात सर्व रंग गुडूप झालेत, इतकं सगळं होऊनही आभाळ मात्र शांतच आहे.

सूर्यास्त पाहायला आवडतो मला. सूर्योदयाप्रमाणे तितक्याच गोडीनं सूर्यास्त पाहते, कारण हा क्षण मला जाणीव करून देतो की सृष्टीला लाभलेलं एक अलौकिक देणं म्हणजे सूर्य, काही काळकरिता तोसुद्धा अस्ताला जातो. मग आपण तर माणसं आहोत. आपलाही शेवट एक दिवस निश्चित आहे. सृष्टीत जे जन्मलंय एक दिवस त्या प्रत्येकाचा अंत आहेच. या जगात कोणतीच गोष्ट अमर नाही याची जणीव सूर्यास्त करून देतो आणि मग हरवलेलं मन पुन्हा जमिनीवर येतं. मग वाटतं अशाच एका संध्याकाळी एकटीनेच इथे यावं. एकांतात बसावं आणि स्वतःशीच संवाद साधावा. भूतकाळावर एक दृष्टिक्षेप टाकावा. आजवर किती जणांनी मन दुखावली, घडून गेलेल्या कधी कळत कधी नकळतपणे झालेल्या चुका आठवाव्यात, ज्यामुळे किती जणांना त्रास झाला असेल याचा विचार करावा. सोबत या क्षणापर्यंत केलेली चांगली कामंसुद्धा आठवावीत. आपण केलल्या पाप-पुण्याचा स्वतःच हिशोब मांडावा. स्वतःच यासाठी की, स्वतःशी कुणालाच खोटं बोलता येत नाही.

असा विचार करताना अचानक लक्षात येतं की, आपलं श्रेष्ठत्व सिद्ध करण्याच्या नादात आपण समोरच्याचं अस्तित्वच नाकारलेलं असतं. आपलं वर्चस्व गाजविण्याच्या नादात समोरच्याला आपण तुच्छ लेखू लागतो किंवा कधी-कधी समोरचा आपल्याला कमीपणा येईल यासाठी पावली प्रयत्न करीत असतो. यातून सुरू होते स्पर्धा. अभिलाषेतून सुरू झालेल्या या स्पर्धेत मग हळूहळू द्वेष-मत्सरसुद्धा सहभागी होतात आणि अढळपदी राहण्याच्या या जीवघेण्या स्पर्धेत आपण आपलं माणूसपण हरवून बसतो. बरं या सगळ्याकडे दुर्लक्ष करावं तर त्याचाही वेगळा अर्थ काढला जातो. मग शांत झालेलं मन पुन्हा पेटून उठतं आणि पुन्हा सुरू होते अस्तित्वाची लढाई, पण या सूर्यास्ताकडे पाहून मन शांत झालंय, वास्तवाचं भान आलंय.

गतकाळ आठवला की, वाटतं आपण असे कधीच नव्हतो. मनात विचार येतो तोसुद्धा एक स्वभाव गुणधर्म आहे. ती एक वृत्ती आहे, जी कधीच संपू शकत नाही. मग अशा वेळी काय करायचं? तर आपण अलिप्त व्हायचं. बुद्धाला आठवायचं. त्याच्यातला निर्मोही, निर्मत्सरीपणा स्वतःमध्ये आणण्याचा प्रयत्न करायचा. सूर्यास्तासोबत सगळं विसरून नव्यानं आयुष्य जगण्याचा संकल्प करायचा, कारण अनंत आशा आणि स्वप्नं घेऊन उद्याचा सूर्योदय होणार असतो...!

**-ऋतुजा म्हात्रे-महामुनी,**
पनवेल




# तुमचा मोबाईल फोन असली आहे का ?

आजचा बाजार सर्व प्रकारच्या उत्पादनांच्या पहिल्या प्रतींनी भरलेला आहे. ब्रँडेड शूज असोत, कपडे असोत, घड्याळे असोत, सौंदर्यप्रसाधने असोत, इअरबड्स असोत, म्युझिक सिस्टम असोत आणि अगदी स्मार्टफोन असोत, त्याच्या प्रती विकल्या जातात.



ही उत्पादने अगदी मूळ उत्पादनांसारखी दिसतात, परंतु गुणवत्ता, टिकाऊपणा आणि सुरक्षिततेच्या बाबतीत ती मूळ उत्पादनांच्या जवळपासही नाहीत. बऱ्याच वेळा मोठ्या ब्रँडच्या नावाखाली ग्राहकांना फसवले जाते आणि त्यांना बनावट उत्पादने मिळतात.अशा बनावट उत्पादनांमुळे केवळ पैशाचे नुकसान होत नाही तर सुरक्षेवरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे बाजारात खरेदी करताना खरे आणि बनावट ओळखणे खूप महत्वाचे आहे.

बनावट फोनला बळी पडू नये म्हणून मोबाईल खरेदी करताना काही आवश्यक खबरदारी घेणे खूप महत्वाचे आहे. सर्वप्रथम, नेहमी ब्रँडेड स्टोअर किंवा विश्वासार्ह ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून फोन खरेदी करण्याचा प्रयत्न करा.जर तुम्हाला कुठेतरी खूप स्वस्त डील दिसली तर त्यावर लगेच विश्वास ठेवू नका, कारण अशा डीलमध्ये अनेकदा बनावट किंवा नूतनीकरण केलेले फोन विकले जातात. खरेदी करताना पॅकिंग, सील आणि बिल नीट तपासायला विसरू नका.फोन चालू करा आणि सेटिंग्जमध्ये जाऊन IMEI आणि मॉडेल नंबर तपासा आणि अधिकृत पोर्टलवर त्याची पडताळणी करा. त्याच वेळी, जर तुम्ही ऑनलाइन खरेदी करत असाल तर ग्राहकांचे पुनरावलोकने आणि विक्रेत्यांचे रेटिंग नक्कीच तपासा जेणेकरून नंतर कोणतीही समस्या येणार नाही.खरा आणि खोटा मोबाईल ओळखण्याचे अनेक मार्ग आहेत. सर्वात सोपा मार्ग म्हणजे खचएख नंबर तपासणे. प्रत्येक खऱ्या फोनचा एक अद्वितीय खचएख नंबर असतो जो तुम्ही *०६ डायल करून तपासू शकता.

तुम्ही सरकारी साइटवर किंवा ब्रँडच्या वेबसाइटवर हा नंबर सत्यापित करू शकता.याशिवाय, बनावट फोनची डिस्प्ले क्वालिटी, कॅमेरा रिझोल्यूशन आणि बॅटरी परफॉर्मन्स लवकर खराब होते, तर मूळ फोन जास्त काळ टिकतो.बिल आणि वॉरंटी हे तुम्ही खऱ्या आणि अधिकृत डीलरकडून फोन खरेदी केल्याचा पुरावा आहे. बनावट किंवा पहिल्या प्रतीच्या फोनमध्ये सहसा खरे वॉरंटी कार्ड नसते.

# 'आयसीसी'चे माजी अध्यक्ष जगमोहन दालमिया



## निमित्त

चोपून विंचरलेले केस, बारीक काड्यांचा चष्मा, भेदक डोळे आणि अंगावर सफारी. एखाद्या उद्योगपतीला साजेसं असं वर्णन वाटतंय ना. रुढार्थाने याचं उत्तर हो असं आहे. पण जगमोहन दालमिया केवळ उद्योगपती नव्हते. त्यांनी क्रिकेटला उद्योगाचं कोंदण मिळवून दिलं. क्रिकेट केवळ करमणुकीपुरता खेळ न ठेवता क्रिकेटवर आधारित अर्थकारण उभं करण्याचं श्रेय दालमिया यांना जातं.

क्रिकेट प्रशासनातील राजकीय लढाया असतो किंवा प्रक्षेपण हक्कांसाठी वाटाघाटी असोत- क्रिकेट प्रशासक म्हणून त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर छाप उमटवली. क्रिकेटच्या मैदानात आणि कामकाजावरची ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडची मक्तेदारी मोडून काढत भारताला क्रिकेटच्या पटलावरचं प्रमुख सत्ताकेंद्र म्हणून नावारुपाला आणण्याचं काम दालमियांनी केलं.

३० मे १९४० रोजी मारवाडी कुटुंबात जन्मलेल्या दालमिया यांना १९व्या वर्षी कुटुंबाच्या बांधकाम व्यवसायात प्रवेश करावा लागला. एमएल दालमिया अँड सन्स असं या कंपनीचं नाव होतं. त्या वर्षी त्यांच्या वडिलांचं निधन झालं आणि दालमिया यांना लहानपणीच कर्तेपण स्वीकारलं. स्कॉटिश चर्च कॉलेजात त्यांचं शिक्षण झालं. सामर्थ्यवान क्रिकेट प्रशासक अशी ओळख प्रस्थापित करणारे दालमिया तरुणपणी क्रिकेट खेळायचे. जोराबागान आणि राजस्थान क्लबसाठी ते खेळायचे. पण आपण क्रिकेटमध्ये मोठी मजल मारू शकणार नाही हे त्यांच्या लक्षात आले.

बी.एन. दत्त यांच्या मार्गदर्शनाखाली दालमिया यांनी कॅब अर्थात 'क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगाल'मध्ये प्रवेश केला. १९७९मध्ये दालमियांचा बीसीसीआय अर्थात बोर्ड ऑफ क्रिकेट कंट्रोल इन इंडियामध्ये प्रवेश केला.


दालमिया आणि आय.एस. बिंद्रा यांनी स्पर्धांच्या आयोजनावरची ऑस्ट्रेलिया, इंग्लंडची मक्तेदारी मोडून काढायचं ठरवलं. या दोघांनी कष्टपूर्वक १९८७चा विश्वचषक आशियाई उपखंडात आणला. या विश्वचषकाचं प्रायोजकत्व रिलायन्सकडे होतं.

१९९३मध्ये भारत-इंग्लंड मालिकेचे हक्क ट्रान्सवर्ल्ड इंटरनॅशनला देण्यात आले. बीसीसीआयला यातून १८ लाख रुपये मिळणार होते. डीडी म्हणजे दूरदर्शनला ट्रान्सवर्ल्ड इंटरनॅशनलकडून हक्क विकत घ्यावे लागले. बीसीसीआयने ६००००० डॉलर्सची कमाई केली. बिंद्रा आणि दालमिया बीसीसीआयच्या संयुक्त अध्यक्ष होते. दालमिया आशियाई क्रिकेट परिषदेचेही अध्यक्ष होते.

दालमियांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षपदाच्या मुकाबल्यात दोन तृतीयांश मताधिक्य नसल्याच्या तांत्रिक नियमामुळे त्यांना अध्यक्ष होता आलं नाही. पण दालमिया हार मानणाऱ्यांपैकी नव्हते. वर्षभरात पुन्हा निवडणुका झाल्या आणि दालमिया आयसीसीचे चेअरमन झाले. आयसीसीच्या अध्यक्षपदी विराजमान होणारे दालमिया आशिया उपखंडातले पहिलेच प्रशासक होते.

क्रीडा प्रशासकाला किती खेळ कळायला हवा असं एकदा दालमिया यांना विचारण्यात आलं. त्यांचं उत्तर मार्मिक असं होतं. खेळाचं प्रशासन चालवण्यासाठी आवश्यक इतका मी खेळलो आहे. मैदानावरच्या गोष्टींसाठी अन्य माणसं आहेत ज्यांना विषयाची जाण आहे. ते मला सल्ला देऊ शकतात, असं ते म्हणाले होते. २० सप्टेंबर २०१५ रोजी दालमियांचं निधन झालं.

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हाडे होतील मजबूत; 'या' ड्रायफ्रुटबद्दल जाणून घ्या

निरोगी राहण्यासाठी तज्ज्ञ सुका मेवा खाण्याचा सल्ला देतात. अनेक जण आहारात ड्रायफ्रुट्सचा समावेश करतात, पण खूप कमी लोकांना माहिती आहे की एक ड्रायफ्रुट जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. ते म्हणजे पहाडी बदाम, ज्याला कुल्ठी किंवा चिलगोजा म्हणूनदेखील ओळखले जाते. याला काजू आणि बदामांपेक्षा जास्त शक्तिशाली मानले जाते.



विशेषत: जेव्हा शरीराला शक्ती आणि पोषण देण्याची गरज असते. शरीराच्या स्नायूंना बळकट करण्यासाठी, हाडांमध्ये लोहाची कमतरता भरुन काढण्यासाठी आणि चांगल्या आरोग्यासाठी हे फायदेशीर आहे. हेझलनट्सच्या सेवनाने शरीराला अनेक फायदे मिळतात. आज आम्ही तुम्हाला हेझलनटचे काही प्रमुख फायदे सांगणार आहोत.

पहाडी बदामामध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने आढळतात. जे आपल्या स्नायूंना बळकट करु शकतात. कमकुवत बरगड्यांना मांस पुरवण्यास देखील ते मदत करतात. याच्या सेवनाने ताकद तर मिळतेच पण बारीक लोकं देखील वजन वाढवू शकतात. ज्यांना कमकुवत स्नायूंचा त्रास आहे त्यांच्यासाठी हे उपयुक्त आहे.

**लोह आणि ओमेगा -३**

हा लोहाचा उत्कृष्ट स्रोत आहे, ज्याच्या सेवनाने तुमचा अशक्तपणा दूर होतो. लोहाच्या कमतरतेमुळे निमियासारख्या समस्या देखील दूर होतात. लोहाच्या पुरवठ्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि हाडे मजबूत होण्यास मदत होते. त्यात ओमेगा -३ फॅटी ऍसिड आढळतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी ते मदत करतात.

**कॅल्शियम आणि हाडांची ताकद**

हेझलनट्समध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम असते. जे हाडे मजबूत करतात. हाडे नैसर्गिकरित्या निरोगी ठेवण्यासाठी हा एक उत्तम स्रोत आहे. त्यामुळे त्याचा आहारात समावेश केला पाहिजे. शरीराला ऊर्जा देतात. त्यामुळे अशक्तपणा आणि थकवा टाळता येतो.

हेझलनट स्नायूंना मजबूत तर करतातच आणि लोहाच्या कमतरतेवर मात करण्यास मदत करतात. यामुळे हाडांचे आरोग्यदेखील सुधारतात. काजू आणि बदामांपेक्षाही अधिक शक्तिशाली आणि पौष्टिक आहे.

# शून्य विद्यार्थी, तरीही शाळा सुरूच!

## रोह्यातील नेहरूनगर येथील प्रकार



**धाटाव : प्रतिनिधी**

ऑगस्ट महिन्याच्या मासिक पत्रिकात नगरपालिकेच्या नेहरूनगर शाळेत शुन्य विद्यार्थी असल्याची नोंद करण्यात आली आहे. विद्यार्थी संख्या शून्य झाली तरी प्रशासनाने शाळेत दोन शिक्षक कार्यरत ठेवल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. प्रशासन अधिकारी कार्यवाही करत नसल्याने दोन शिक्षकांसाठी दर महिन्याला लाखो रुपयांचा खर्च शासनाच्या माथी मारला जात आहे.

रोहा नगर पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी होत असतानासुद्धा प्रशासन अधिकारी यांनी गेल्या वर्षी सात नवीन शिक्षकांची नियुक्ती केली होती. प्रशासनाने नेहरूनगर शाळा बंद केल्यास हे सर्वच शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. अतिरिक्त शिक्षकाच्या बदल्या रोखण्यासाठी नेहरूनगर शाळा सुरू ठेवणे गरजेचे बनले आहे. या शिक्षकांसाठी केलेल्या अभय प्रक्रियेत मोठे अर्थकारण झाल्याचा आरोप होत आहे.

नेहरूनगर शाळेत ऑगस्ट महिन्याच्या मासिक पत्रिकात पट शून्य झाल्याचे स्पष्ट झाल्याने गेल्या अनेक दशकांपासून विद्यार्थी घडवणारी ही शाळा आता बंद झाली असली तरी व्यवहारीक संबंध गुंतलेले असल्याने शाळा बंद करण्याची प्रक्रिया लांबविली जात आहे.

विद्यार्थी नसलेल्या नेहरूनगर शाळेत दोन शिक्षक लाखो रुपये पगार घेऊन माशा मारत असताना रोहा नगर पालिकेच्या इतर शाळांमध्ये खाजगी शिक्षक भरले आहेत. या खाजगी शिक्षकांमुळेच शासनाचे पगार घेणाऱ्या नियमित शिक्षकांवर अन्याय होत असल्याची शिक्षकांमध्ये भावना आहे. खाजगी शिक्षक भरण्याचे अधिकार प्रशासन अधिकाऱ्यांना कुणी दिले असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

> **नेहरूनगर शाळेत विद्यार्थी नसल्याने तेथील दोन शिक्षकांचे समायोजन मंगलवाडी संकुलातील शाळेत करण्यात आले आहे.**
> **–अजयकुमार एडके**
> **मुख्याधिकारी तथा प्रशासक, रोहा अष्टमी नगरपालिका**

# न्याय सारथी प्रणालीच्या माध्यमातून घरातून पोलीस तक्रार करता येणार

**चौक : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा पोलिसांकडून न्याय सारथी ही आधुनिक प्रणाली सुरू करण्यात आली असून तिच्या माध्यमातून नागरिकांना घरबसल्या तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. क्यूआर कोड स्कॅन करून थेट तक्रार करता येणार असल्याची माहिती खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी दिली.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या नेतृत्वाखाली, रायगड पोलीस आणि सिमप्लरटुडे एआय यांच्या संयुक्त विद्यमाने न्याय सारथी प्रणाली कार्यान्वित झाली आहे. पोलीस ठाण्यात जाण्याची भीती वाटणाऱ्या अथवा तक्रार कशी करावी हे न कळणाऱ्या नागरिकांसाठी हा उपक्रम उपयोगी ठरणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या ॲपमुळे तक्रारी कायदेशीर मार्गाने थेट पोलिसांपर्यंत पोहोचणार आहेत, त्यामुळे गुन्हेगारांना वेळीच आळा बसेल आणि अन्यायग्रस्तांना न्याय मिळेल.

खालापूर पोलीस ठाण्यात सात तक्रारींची नोंद झाल्याची माहिती उपलब्ध झाली आहेत. हरवलेल्या किंवा चोरी झालेल्या वस्तू, छेडछाड व त्रास, सायबर गुन्हे अशा घटनांबाबतच्या तक्रारी न्याय सारथी यावर करता येतील. खालापूर तालुक्यातील नागरिकांनी भीती न बाळगता या ॲपचा वापर करावा, असे आवाहन केले

# श्रीवर्धन तालुक्यात नारळाच्या उत्पन्नात कमालीची घट, फळाचा आकारदेखील घटला





**श्रीवर्धन : बातमीदार**

संपूर्ण श्रीवर्धन तालुक्यातील किनारपट्टीचा भाग हा समुद्रकिनारी वसलेला आहे. नारळ, पोफळीच्या वाड्यांमध्ये अनेक गावे विसावलेली आहेत. श्रीवर्धन तालुक्याला समृद्ध अशी ५२ किलोमीटर लांबीची किनारपट्टी लाभलेली आहे. दिघी ते बागमांडले या परिसरातील किनारपट्टीच्या भागांमध्ये नारळ, सुपारी, त्याचप्रमाणे केळीच्या बागा मोठ्या प्रमाणावरती पाहायला मिळतात. तर या ठिकाणी असलेल्या समुद्रकिनाऱ्यांमुळे या ठिकाणी मासळी मिळण्याचे प्रमाण देखील मुबलक प्रमाणात असते.

सध्या संपूर्ण महाराष्ट्रा पासून ते देशापर्यंत अनेक पर्यटकाना समुद्राचे मोठ्या प्रमाणावर आकर्षण असते. तालुक्यात समुद्र किनारे पाहण्यासाठी व समुद्र स्नानाचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक खूप मोठ्या प्रमाणावर येत असतात. त्यामुळे या ठिकाणच्या पर्यटन व्यवसायाला खूप मोठ्या प्रमाणात चालना मिळालेली आहे. श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर, श्रीवर्धन शहर, आरावि, दिवेआगर, वेळास या ठिकाणी नारळाच्या व सुपारीच्या बागा मोठ्या प्रमाणात आहेत. परंतु मागील काही दिवसांपासून नारळाच्या उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणावर घट झाल्याकारणाने नारळाचे बाजारभाव खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.

पंधरा ते वीस वर्षांपूर्वी आंध्र प्रदेश व केरळ या राज्यांमधून काही व्यापारी नारळाची रोपे घेऊन श्रीवर्धन परिसरात विकण्यासाठी येत असत. अनेक लोकांनी त्यांच्याकडून ही रोपे घेऊन आपल्या बागांमध्ये किंवा शेताच्या बांधावर लावली होती. केरळ किंवा आंध्र प्रदेशातील असलेल्या नारळांच्या जाती या लहान आकाराच्या आहेत. आपण त्याला महाराष्ट्रात तारवटी नारळ असे संबोधतो. ही लागवड केलेली नारळाची झाडे मोठी झाल्यानंतर त्यावरील पराग कणांचा संसर्ग या ठिकाणच्या ओरिजिनल गावठी नारळावरती झाल्यामुळे, या नारळाचा आकार देखील कमी झाले होणे मुख्य कारण आहे.

त्याच प्रमाणे ३ जून २०२१ साली श्रीवर्धन तालुक्याला तडाखा दिलेल्या निसर्ग चक्रीवादळाने जवळजवळ ५०% नारळाची झाडे ही तुटून पडली. त्यामुळे नारळाची नवीन लागवड केल्यानंतर साधारण आठ ते दहा वर्षांमध्ये नवीन फळे येण्यास सुरुवात होतात. त्यामुळे देखील उत्पादनात मोठ्या प्रमाणावर घट झाल्याचे जाणवते. श्रीवर्धन येथील रोठा सुपारी ज्याप्रमाणे जगप्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणच्या नारळाची प्रत देखील एकेकाळी चांगली होती. पातळ मलई असलेल्या नारळाचे पाणी अतिशय गोड लागत असे. परंतु आता नारळाची जात हायब्रीड होत चालल्यामुळे नारळाच्या उत्पादनात घट देखील झाली आहे व आकार देखील कमी झाला आहे. तरी या वरती कृषी विभागाने संशोधन करणे अपेक्षित आहे. कृषी विभागाकडून नारळाचे उत्पादन वाढवण्यासाठी नारळाचा आकार मोठा होण्यासाठी नागरिकांना मार्गदर्शन होणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

# मुंबई विद्यापीठाकडून पिल्लई कॉलेजला सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्‌स, कॉमर्स अँड सायन्स (ऑटोनॉमस) ला मुंबई विद्यापीठाच्या सर्वोत्कृष्ट कॉलेज पुरस्काराने (शहरी श्रेणी) सन्मानित करण्यात आले आहे. या प्रतिष्ठित मान्यतेमुळे पिल्लई कॉलेज उच्च शिक्षणात आघाडीवर आहे आणि ८००हून अधिक संलग्न महाविद्यालयांमध्ये अव्वल स्थानावर पोहोचले आहे.

मुंबई विद्यापीठातील कलिना येथील ग्रीन टेक्नॉलॉजी ऑडिटोरियममध्ये आयोजित एका औपचारिक समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी भूषवले आणि कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले.

पिल्लई कॉलेजच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व प्राचार्य डॉ. गजानन वडेर यांनी केले, त्यांच्यासोबत उपप्राचार्य दीपिका शर्मा, आयक्यूएसी समन्वयक डॉ. आरती सुखेजा, वरिष्ठ प्राध्यापक आणि विद्यार्थी परिषद, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि व्यवस्थापन संघटनेचे विद्यार्थी प्रतिनिधी होते.

रसायनीतील पिल्लई कॅम्पस शिक्षणासाठी आकर्षण ठरत आहे.पिल्लई कॉलेज नेहमीच शिक्षणाद्वारे जीवन बदलण्यावर विश्वास ठेवत आले आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या समर्पणाचा पुरावा आहे. असे पिल्लई महात्मा एज्युकेशन सोसायटीच्या सह-संस्थापक आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. डॅफ्ने पिल्लई यांनी टिप्पणी केली.पिल्लई कॉलेज आता मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या सर्वोच्च संस्थांमध्ये अभिमानाने स्थान मिळवत आहे, जे उत्कृष्टतेचे खरे मापदंड आहे असेही त्या म्हणाल्या.

१९९८ मध्ये स्थापित, पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्‌स, कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) ने शैक्षणिक आणि संस्थात्मक उत्कृष्टतेमध्ये सातत्याने बेंचमार्क स्थापित केले आहेत. सलग तीन NAAC सायकलमध्ये 'अ' ग्रेड मान्यता मिळवण्याच्या दुर्मिळ कामगिरीसह, कॉलेजला आता सशक्त स्वायत्त दर्जा देण्यात आला आहे, ज्यामुळे त्याला नाविन्यपूर्ण, उद्योग-संबंधित अभ्यासक्रम डिझाइन करण्याचे अधिक स्वातंत्र्य मिळाले आहे.हे महाविद्यालय शिक्षणाकडे पाहण्याच्या समग्र दृष्टिकोनासाठी ओळखले जाते, ज्यामध्ये शैक्षणिक कठोरता आणि सामाजिक जबाबदारी आणि नवोपक्रम यांचा समावेश आहे. शहरी श्रेणीतील सर्वोत्तम महाविद्यालय म्हणून निवड होण्यात विद्यार्थी संघ, प्रभावी संशोधन संस्कृती आणि व्यापक समुदाय सहभाग महत्त्वाची भूमिका बजावत आहे.या मान्यतेसह, पिल्लई कॉलेज मुंबईच्या उच्च शिक्षण क्षेत्रात उत्कृष्टतेचे दीपस्तंभ म्हणून आपली प्रतिष्ठा आणखी मजबूत करत असल्याचे चित्र आहे.

# अपूर्वा जंगम यांचा राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान

**माणगाव :** तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कशेणे या शाळेवर सहाय्यक शिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या उपक्रमशील शिक्षिका अपूर्वा अमोल जंगम यांना सन २०२४-२५ या वर्षीचा देण्यात येणारा महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

या पुरस्काराचा वितरण सोहळा सोमवार दि. २२ सप्टेंबर रोजी मुंबई येथे मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. शिक्षिका अपूर्वा जंगम यांना महाराष्ट्र शासनाचा हा मानाचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे

# 'सीएससी केंद्र ग्रामीण नागरिकांना सेवा पुरविण्याचे महत्त्वाचे माध्यम'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सीएससी केंद्र हे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध शासकीय आणि खाजगी सेवा पुरविण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. महामंडळाने सीएससी केंद्रासमवेत केलेल्या करारामुळे महामंडळाच्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची गरज भासणार नाही, त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाचेल, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अमिता पवार यांनी दिली आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे लाभार्थी आता त्यांच्या जवळच्या कोणत्याही सीएससी केंद्रावर जाऊन महामंडळाच्या योजनांचा लाभ कमी दरात घेऊ शकतात. यामध्ये महामंडळाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज भरणे, कागदपत्र अपलोड करणे, योजनेची सद्य:स्थिती तपासणे आणि आवश्यक मार्गदर्शन मिळवणे यांसारखा सुविधांचा समावेश आहे.

राज्याच्या कानाकोपऱ्यात असलेल्या गरजू आणि पात्र तरुणांपर्यंत महामंडळाच्या योजना पोहचणार आहेत. कमी खर्चात आणि त्यांच्या घराजवळ त्यांना आवश्यक सेवा मिळाल्यामुळे त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करून मराठा समाजातील तरुणांना उद्योजक करण्याचे महामंडळाचा उद्देश पूर्णत्वास नेणे सोपे होईल.

राज्यामध्ये सीएससीचे ७१ हजारपेक्षा जास्त केंद्र कार्यरत असल्याने त्यांच्या माध्यमातून अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या लाभार्थ्यांना त्यांच्या गावातूनच पात्रता प्रमाणपत्र कागदपत्र, बँकेचे कर्ज मंजुरी) बँकेचा हप्ता अपलोड करण्यासाठी प्रत्येकी रुपये ७० शुल्क आकारण्यात येणार असे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी सांगितले आहे. या करारामुळे लाभार्थ्यांचा वेळ वाचणार आहे आणि त्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्याची गरज लागणार नाही

ग्रामीण भागातील उद्योजकतेला चालना मिळेल. यामुळे सद्यस्थितीत महामंडळाच्या नावाखाली लाभार्थ्यांकडून पैसे उकळणाऱ्या अनाधिकृत एजंट लोकांना आळा घालणं शक्य होईल.

# युनायटेड वे संस्थेकडून किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन

**कर्जत : प्रतिनिधी**

युनायटेड वे संस्थेच्या माध्यमातून आदिशक्ती अभियान राबविले जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून आंभेरपाडा येथे किशोरवयीन मुलींसाठी शारीरिक बदलाविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

मुंबई युनायटेड वेच्या माध्यमातून जलसंजीवनी प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून आणि गृप ग्रामपंचायत आंभेरपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने आदिशक्ती अभियान अंतर्गत महिला सक्षमीकरण उपक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी युनायटेड वे चे प्रकल्प प्रमुख विवेक कोळी तसेच आदि शक्ती अभियानाच्या सचिव आदिती भोते यांच्यासह गृप ग्रामपंचायत अंभेरपाडा सरपंच लता लोखंडे, समिती सदस्य तसेच उपसरपंच दत्तात्रय सुपे, ग्रामपंचायत सदस्य बाळू पारधी, विश्वास पारधी, बबिता लांघी, गायत्री तुंगे यांच्यासह आदिशक्ती अभियानाचे अध्यक्ष शशिकला जयराम असवले, समिती सदस्य संतोष काठे, पोलीस पाटील त्र्यंबक धवळा, ग्रामपंचायत कर्मचारी गोविंद लोखंडे आदी उपस्थित होते. अंभेरपाडा, काठेवाडी,बेलाचीवाडी आणि तुंगी या गावातील एकूण १०५ महिला आणि किशोर वयीन मुली उपस्थित होत्या.

आदिशक्ती अभियान समिती सचिव अर्चना भोते यांनी मार्गदर्शन करताना किशोरवयीन मुलींचे व अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण होणार नाही याची दक्षता घेणे, बाल विवाह रोकणे, गर्भवती महिलांचे लसीकरण, गर्भवती महिलांची प्रसूती घरा एवजी दवाखान्यात व्हावी. तसेच जेणेकरून माता आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी व्हावे तसेच कुपोषनास प्रतिबंध करणे आदी विषयी माहिती दिली. ग्रामसेविका वैशाली पाटील यांनी महिला कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा, हुंडा प्रतिबंध कायदा तसेच महिलांसंबंधित सर्व शासकीय योजनांचा लाभ महिलांपर्यंत कसा पोहोचवता येईल. या विषयी मार्गदर्शन करून महिलांच्या आधारकार्ड अपडेट करणे,आयुष्यमान भारत कार्ड काढणे, आदीसाठी कॅम्प आयोजित करण्याचे नियोजन करण्याची माहिती दिली.




**रोहा अष्टमी नगर परिषद**
ता. रोहा, जि. रायगड पिन कोड- ४०२१०९.
फोन नं. कार्यालय-०२१९४-२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४-२३४०७८
email : rohanagarpalika@gmail.com

**जाहीर निविदा/कोटेशन सूचना**

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, रोहा-अष्टमी नगर परिषदेच्या **वैकुंठधाम स्मशानभूमी येथे देखभाल व दुरुस्तीची काम तसेच रोहा अष्टमी नगर परिषद आरोग्य विभागास विविध कामांसाठी JCB, डंपर, पोकलेन, क्रेन, ट्रॅक्टर** व ट्रॉली पुरवठा करण्याकरिता पात्र कंत्राटदार/पुरवठादार यांच्याकडून निविदा/कोटेशन मागविण्यात येत आहेत.

**कामाचे स्वरूप :**

१. रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वैकुंठधाम स्मशानभूमी येथे देखभाल व दुरुस्ती करणे.
२. रोहा-अष्टमी नगर परिषद आरोग्य विभागास विविध कामांसाठी JCB, डंपर, पोकलेन, क्रेन, ट्रॅक्टर व ट्रॉली पुरवठा करणे.

विषयांकित कामाचा तपशील व अटींची माहिती नगर परिषद कार्यालयात आरोग्य विभागात कार्यालयीन वेळेत पाहता येईल. निविदा/कोटेशन सादर करण्याची शेवटची तारीख-३०/०९/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील. तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा/कोटेशन नाकारण्याचा अधिकार नगर परिषदेकडे राहील.

**क्र.रोनप/आरोग्य/कोटेशन/९६८/२०२५-२६**
**दिनांक :- १९/०९/२०२५**

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**



## नावात बदल

माझे जुने नाव **सुरेखा सुनिल म्हात्रे ,** राहणार जाताडे, पो. रसायनी, ता. पनवेल. जि. रायगड ४१०२०७, राज्य महाराष्ट्र, हे माझे जुने नाव असून, **प्रतिज्ञापत्र क्र. १८३२/२०२५ दि. १९/०९/२०२५** रोजी **सौ. संजीवनी सुनिल म्हात्रे** असे बदलले असून, मी या पुढे **सौ. संजीवनी सुनिल म्हात्रे** या नवीन नावाने ओळखली जाईल.

**दि. १९/९/२०२५**

**सही/-**
**सौ. संजीवनी सुनिल म्हात्रे**
जाताडे, पो. रसायनी, ता. पनवेल.
जि. रायगड ४१०२०७,
नवीन नाव



## नावात बदल

माझे जुने नाव **याकूब असगरअली कॉन्ट्रॅक्टर,** राहणार सदाबहार नर्सरी रोज व्हिला कॉलेज रोड करजांडे पनवेल ४१०२०६, राज्य महाराष्ट्र, हे माझे जुने नाव असून, मी **शासन राजपत्र क्र. एम २२२३६९३१ दि. १६ मार्च २०२३** रोजी **याकूब असगरअली बोहरी उर्फ कॉन्ट्रॅक्टर,** असे बदलले असून, मी या पुढे **याकूब असगरअली बोहरी उर्फ कॉन्ट्रॅक्टर** या नवीन नावाने ओळखला जाईल.

**दि. १९/९/२०२५**

**सही/-**
**याकूब असगरअली बोहरी उर्फ कॉन्ट्रॅक्टर**
नवीन नाव



**पेण नगरपरिषद, पेण**
**जाहिर ई - निविदा सुचना क्र - १२**
**सन २०२५-२६**

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजकीय रक्कम रु. | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी रु. | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पेण शहरातील कवंडाळ तलाव सुशोभिकरण करणे | ३,११,०५,०५५/- | ३,११,०५०/- | १५००/- | ३६५ दिवस |

पेण नगरपरिषद हद्दीतील बांधकाम विभागाकडील कामाची जाहिर ई निविदा सूचना शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली असून सदर कामी ई- निविदा दिनांक २०/०९/२०२५ ते ०८/१०/२०२५ या कालावधीमध्ये ऑनलाईन स्विकारणेत येतील.

**जा.क्र.पेनप/का.४/बां.वि/२०२५/२०३४**
**दिनांक :- १९/०९/२०२५**

**सही XXX/-**
**मुख्याधिकारी**
**पेण नगरपरिषद, पेण**

# श्वानांना मास्क लावणे बंधनकारक

## अन्यथा नवी मुंबई महापालिका करणार कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात पशू जन्म नियंत्रण कार्यक्रम कायदयाची अंमलबजावणी सुरू असून त्यानुसार नवी मुंबई महापालिका शहरातील भटक्या श्वानांची निर्बीजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण करणेकरिता सन २००६ पासून तुर्भे येथील श्वान नियंत्रण केंद्र कार्यरत आहे. तसेच पाळीव श्वानांना विभाग कार्यालयांमार्फत श्वान परवाने देण्याची कार्यवाही करण्यात येते. त्या अनुषंगाने सर्व पाळीव श्वान मालकांनी श्वान परवाना प्राप्तीसाठी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा.

सर्वोच्च न्यायालयाची सुमोटो २२ ऑगस्ट २०२५ रोजीच्या आदेशान्वये, महाराष्ट्र शासनाचे मार्गदर्शक सुचनांनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे हद्दीमध्ये ज्याप्रमाणे प्राण्यांचे संरक्षण करणे क्रमप्राप्त आहे. त्याचप्रमाणे प्राणीप्रेमींना कायद्यान्वये जी काळजी घ्यावयाची त्याचीही अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात भटक्या श्वानांचे चावणे, मागे लागणे, लहान मुलांना भिती वाटणे याबाबत नागरिकांकडून अनेक तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.



### श्वानांच्या कोणत्या जाती आक्रमक?

रोटविलर्स, पिट बूल, जर्मन शेफर्ड, डोबरमन व इतर जातीच्या कुत्र्यांचे पालन / पैदास केले जात असल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत. अशा प्रकारच्या श्वानांचा स्वभाव हा अत्यंत हिंस्त्र असतो, अशा जातीच्या श्वानांना रस्त्यावर फिरायला सोडल्यास त्यांच्यापासून इतरांच्या जीवाला धोका होऊ शकतो.

### नागरिकांना आवाहन..

सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, वरील जातींच्या सह सर्व जातींच्या पाळीव श्वानांना योग्य ते लसीकरण केलेले असावे. त्यांना घराबाहेर घेऊन जातांना चेन/बेल्ट याने बांधून सोबत घेऊन जावे. सोबत सुपली तसेच श्वानास त्रास होणार नाही अशा पध्दतीने तोंडाला मास्क लावावा. त्याचप्रमाणे मा.न्यायालयाचे व प्राणी कल्याण मंडळाच्या मार्गदर्शक सूचना व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. मझल न लावता कुत्रा फिरवताना आढळल्यास, योग्य ती कायदेशीर दंडात्मक कार्यवाही/ कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

# अंधश्रद्धा निर्मूलन विषयावर उरण महाविद्यालयात कार्यशाळा

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले गेले. या कार्यशाळेत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून विवेकवाहिनी या उपक्रमाची भूमिका व कार्य याविषयी सविस्तर विवेचन या कार्यशाळेत करण्यात आले.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक घरचे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यशाळेत महेंद्र पाटेकर (प्रधान सचिव, रायगड जिल्हा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती) यांनी श्रद्धा-अंधश्रद्धा म्हणजे काय व जीवनाची पंचसूत्री याविषयी मार्गदर्शन केले. तर मा. वरद ताटे (महिला विभाग प्रमुख, पनवेल शाखा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती) यांनी विद्यार्थ्यांना व्यायाम अवांतर वाचन व निर्व्यसनी राहणे याविषयीचा सल्ला देऊन विविध विषयांवर विद्यार्थ्यांना बोलते केले. तसेच विवेकवाहिनी या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी आयोजित केल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमाची माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.व्हि.एस. इंदुलकर यांनी केले, सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.दत्ता हिंगमिरे यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. पराग कारुळकर यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात तुकाराम शिंदे (सहकार्यवाह, विवेक जागर संस्था, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती) मनोहर तांडेल (प्रशिक्षण विभाग प्रमुख, रायगड जिल्हा, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती) प्रा. डॉ. हनुमंत जगताप, प्रा.आर. टी.ठावरे, प्रा. विनिता तांडेल, प्रा.दिपु यादव आदी उपस्थित होते.

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानात व्यापक आरोग्य तपासणी

**नवी मुंबई : बातमीदार**

कुटूंबाच्या आरोग्यासाठी महिलांचे आरोग्य चांगले असणे अत्यंत महत्वाचे असून त्यादृष्टीने केंद्र सरकारमार्फत जाहीर करण्यात आलेले 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे अभियान नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात चांगल्या पध्दतीने राबविले जाईल असे सूचित करीत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी पुढील पंधरवड्यात महिला व बालकांच्या आरोग्य तपासणीला प्राधान्य देतानाच त्यासोबत महिला प्रधानमंत्री मातृवंदना योजना, पोषण अभियान, निमियामुक्त भारत, आयुष्मान भारत अशा विविध योजनांचीही प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात येईल, असे सांगितले.

महिलांचे आरोग्य आणि सक्षमीकरण हे कुटुंबांच्या, समाजाच्या तसेच संपूर्ण देशाच्या प्रगतीसाठी केंद्रस्थानी आहे हे लक्षात घेत १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे अभियान आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या आदेशानुसार राबविले जात आहे. त्याचा नवी मुंबई



महानगरपालिका क्षेत्रातील शुभारंभ महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते वाशी सार्वजनिक रुग्णालय येथे झाला.

'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानाचा राष्ट्रीय स्तरावरील शुभारंभ कार्यक्रम भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मध्य प्रदेशातील धार याठिकाणी झाला तसेच राज्यस्तरीय शुभारंभ कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला.

या दोन्ही कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण वाशी सार्वजनिक रुग्णालय येथे मोठया एलईडी स्क्रीनवरुन प्रक्षेपित करण्यात आले होते. हे दोन्ही कार्यक्रम आयुक्तांसह उपस्थित विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी व नागरिक यांनी पाहिल्यानंतर नवी मुंबई महापालिका स्तरावरील अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

या वेळी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचेसमवेत अधिकारी उपस्थित होते. सदर अभियान महिला व बालविकास मंत्रालय, भारत सरकारतर्फे जाहीर करण्यात आलेल्या पोषण महिन्याशी संलग्न राबविण्यात येत असून या अभियानांतर्गत महानगरपालिकेची सर्व रुग्णालये, माता बाल रुग्णालये व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे याठिकाणी महिला व बालकांसाठी आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत.

यासोबत अभियानांतर्गत मुलांची तपासणी तज्ज्ञांमार्फत करण्यात येणार असून लसीकरणही करण्यात येणार आहे. सार्वजनिक रूग्णालय, वाशी येथील कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत 'प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियाना'च्या अनुषंगाने क्षयरोग रूग्णांना पोषण आहार पुरविणेकरिता मोलाचे योगदान देणाऱ्या प्रगती फाउंडेशन व सरदार पटेल सेवा संघ या स्वयंसेवी संस्थांना 'निक्षय मित्र' सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात करण्यात आला.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वादविवाद स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता अकाउंट व फायनान्स विभागातर्फे महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले होते.



स्पर्धेचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सादरीकरण कौशल्य, व्यासपीठ धाडस, भाषेवरती प्रभुत्व अशी वेगवेगळी कौशल्ये विकसित व्हावीत हा होता. या स्पर्धेत एकूण २५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. महादेव चव्हाण यांनी काम पाहिले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. श्वेतांबरी बोठे यांनी केले तसेच प्रा. आनंद शेलार, प्रा. योगिता पाटील, प्रा. करिष्मा कडव, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले तसेच या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला त्यामध्ये प्रामुख्याने, सुफिना बर्मने व मेहक यादव, रंजीत मंडल व तिस्ता बालीयान, गौरव गुप्ता व खदीजा ताजीर या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक फटकाविला.

महाविद्यालयाच्या प्रभारी डॉ. महेश्वरी झिरपे व प्रा. डॉ. प्रवर शर्मा अकाउंट व फायनान्स विभागाचे विभाग प्रमुख यांनी सर्व विजेतांचे पारितोषिके देऊन अभिनंदन केले.

# यूईएस स्कुल आणि ज्यूनिअर कॉलेजमध्ये हिंदी दिवस

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील उरण एज्युकेशन सोसायटी शाळा आणी ज्यूनिअर कॉलेजमध्ये हिंदी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून द्रोणागिरी भूषण, समाजसेवक विकास कडू हे उपस्थित होते. ते उरण एज्युकेशन सोसायटीचे पालक शिक्षक संघचे उपाध्यक्ष सुद्धा आहेत. प्रमुख पाहुणे विकास कडू यांचा मोठा सन्मान करण्यात आला. त्या नंतर मुलांचे सुंदर नूत्यही झाले.

मुलांनी उत्तम पद्धतीने सुंदर नूत्य सादरीकरण केले. तसेच १२ वीच्या विद्यार्थांनी आरक्षण या विषयावर छोटीशी नाटिका रुपी वाद विवाद कार्यक्रम खूप सुंदर प्रकारे सादरीकरण केले. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी शाळा ज्यू. कॉलेजच्या प्रॅन्सिपल सिमरन दहीया, मीनाक्षी गुप्ता, नयना सिंग, रेश्मा पाटील, गणेश जाधव, मिलिंद सर यांनी विशेष मेहनत घेतली.शेवटी शिक्षकांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमांची सांगता केली.



# महाराष्ट्र राज्य संलग्न रायगड गणित अध्यापक मंडळातर्फे विद्यार्थी गुणगौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य संलग्न रायगड गणित अध्यापक मंडळातर्फे नुकताच १४ सप्टेंबर रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ श्री बापूसाहेब विसपुते कॉलेज नवीन पनवेल येथे झाला. अध्यक्षस्थानी विसपुते कॉलेजच्या प्राचार्या सीमा कांबळे या होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य सल्लागार समितीचे वीर सर आणि रायगड गणित अध्यापक मंडळाचे माजी अध्यक्ष सोरटे सर, शिरकांडे सर, घोडके सर, दिलीप मोरे सर, जोशी मॅडम तसेच भीमराव खेडकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा सीमा कांबळे व वीर सर यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. सीकेटी इंग्लिश मीडियम सेकंडरी स्कूलमधील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर करून त्यानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली. सूत्रसंचालन सीकेटीच्या शिक्षिका मनीषा मॅडम यांनी केले गेल्या वर्षीच्या अहवालाचे वाचन प्रास्ताविकामध्ये रायगड गणित अध्यापक मंडळ परीक्षा समिती प्रमुख जाधव सर यांनी केले गणित संबोध परीक्षा व प्राविण्य परीक्षा तसेच इयत्ता दहावीसाठी पारंगत परीक्षा यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थी बसवावेत असे अहवालात सांगण्यात आले.

प्रमुख पाहुणे वीर सर यांनी मोजक्या शब्दात आयुष्याचे गणित मुलांना व पालकांना समजावून सांगितले. सोरटे यांनीही मार्गदर्शनपर भाषण केले. भीमराव खेडकर यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत स्पर्धेचे महत्त्व पटवून दिले त्यानंतर अध्यक्षिय भाषणात सीमा कांबळे यांनीही मुलांना आयुष्याची उद्दिष्टे व ध्येय साध्य करण्यासाठी अपार मेहनतीची गरज असते हे सांगितले.

गुणगौरव सोहळ्यामध्ये गणित संबोध परीक्षा इयत्ता पाचवी व आठवीसाठी एकूण २१० मेडल व सर्टिफिकेटचे वाटप करण्यात आले. गणित प्राविण्य परीक्षा व त्यानंतर प्रज्ञा परीक्षा यामधील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना सिल्वर मेडल व सर्टिफिकेट मंडळाकडून देण्यात आले.

यावर्षीची महत्त्वाची निकालाची बाजू म्हणजे म.ना.नेने कन्या विद्यालय पेण येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी कुमारी रिद्धी सुनील मनोहर हिला महाराष्ट्र राज्यात २३ वा क्रमांक पटकावून शिष्यवृत्ती (रोख रक्कम१५००) ट्रॉफी व सर्टिफिकेट याचा मान मिळाला मान्यवरांच्या हस्ते तिचे विशेष कौतुक व सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे इयत्ता दहावीतील गणित पारंगत परीक्षेतील जिल्ह्यातील प्रथम तीन क्रमांकाचे विद्यार्थी यांचाही सत्कार करण्यात आला.

विसपुते कॉलेजचा सर्व स्टाफ व सीकेटीचे मुख्याध्यापक चव्हाण, पर्यवेक्षिका गिरीजा व सहकाऱ्यांनी सहकार्य केले.



# नवीन पनवेलमध्ये विश्वकर्मा पूजा महोत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जय माता दी चॅरिटेबल ट्रस्ट, नवीन पनवेल यांनी बुधवारी (दि.१७)आयोजित केलेला विश्वकर्मा पूजा महोत्सव, सेक्टर ५अ, नवीन पनवेल येथील श्री वृंदावन बाबा मंदिर हॉलमध्ये मोठ्या उत्साहात झाला.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने मान्यवर, भाविक आणि भाविक उपस्थित होते, भजन कीर्तनात सहभागी झाले होते, दर्शन घेतले होते आणि महाप्रसादाचा लाभ घेतला होता. मान्यवरांनी त्यांच्या संदेशांमध्ये स्पष्ट केले की, हा उत्सव प्रामुख्याने विश्वकर्माच्या पाच पुत्रांच्या वंशजांनी साजरा केला जातो: मनु, माया, त्वष्ट, शिल्पी आणि देवज्ञान. हा उत्सव विशेषतः कारखाने आणि औद्योगिक क्षेत्रात साजरा केला जातो. विश्वकर्मा यांना विश्वाचा निर्माता आणि देवांचा शिल्पकार मानले जाते.

भगवान विश्वकर्मा जयंतीला, अभियंते, वास्तुविशारद, कारागीर, चालक आणि इतर कारखाने, कार्यशाळा आणि उद्योगांमध्ये विशेष पूजा करतात. विश्वकर्मा जी यांनी जे काही बांधले ते अपवादात्मकपणे सुंदर, टिकाऊ आणि कलात्मक होते. कोणतेही काम पूर्ण निष्ठेने आणि कौशल्याने केले तर ते खूप मोठे किंवा लहान नसते. मान्यवरांना वस्त्रे आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

या वेळी शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, उद्योजक मनोरंजन सिंह आणि प्रजापती समाज विकास मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्र प्रताप प्रजापती यांच्यासह अनेक मान्यवरांनी पूजेमध्ये सहभाग घेतला आणि दर्शन घेतले.

अध्यक्ष सत्यनारायण शर्मा, उपाध्यक्ष जयप्रकाश जयस्वाल, सचिव प्रयाग शाह, कोषाध्यक्ष मुन्शी पंडित, सल्लागार विनोद सिंग, रामप्यारे शाह, राजनाथ पासवान आणि दूधनाथ शर्मा यांच्यासह इतरांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

# कळंबोली पोस्ट कार्यालयात नागरिकांची गैरसोय

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली पोस्ट कार्यालयात नागरिकांना पोस्ट कार्यालयाची कार्य प्रणाली डोकेदुखी ठरू लागली आहे. अनेकदा येथील सर्व्हर डाऊन होत असल्याने व येथील कर्मचाऱ्याकडून ग्राहकांना मिळत असलेल्या वागणुकीमुळे या पोस्ट कार्यालयात दररोज नागरिक व कर्मचार्यांमध्ये शाब्दिक चकमक होताना दिसत आहे.

कळंबोलीतील पोस्ट कार्यालयात गेल्या काही महिन्यांपासून येथील नागरिकांना आरडी एफडी अशा विविध योजनांचे पैसे भरण्यासाठी लांबच लांब रांगा लावाव्या लागत आहेत. या सर्वांवर कळंबोली पोस्ट कार्यालयातील अधिकारी यांनी सरोवर डाऊन असल्याचे कारण सांगून नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहण्यास सांगतात. नंतर वेळ संपल्याचे कारण सांगत त्यांना परत पाठवत आहेत. दरम्यान, एखाद्या जागरूक नागरिकाने आवाज उठवल्यानंतर आमच्या कार्यालयाची तुम्ही तक्रार करा, असे ते सांगतात. त्यातून त्यांच्यात नियमित वाद होत आहेत.

दरम्यान, काही नागरिकांनी त्यांना विचारणा केली असता येथील काही अधिकारी व कर्मचार्यांनी त्यांना उद्धट उत्तरे देत तुम्ही आमची तक्रार करा, असे स्पष्ट शब्दात त्यांना सुनावले. त्यामुळे येथील कर्मचारी नागरिकांना अयोग्य वागणूक देत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१९) वाणिज्य विभागातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले होते.



या स्पर्धेत एकूण ३६ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या स्पर्धेत प्रावीण्य दाखवणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी तीन जणांना विजेते म्हणून घोषित करण्यात आले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, प्रथम व तृतीय क्रमांकाचे विजेते वाणिज्य शाखेतील प्रथम वर्षातील वर्गातील विद्यार्थी होते, तर दुसरा क्रमांक मॅनेजमेंट स्टडीज प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्याने पटकाविला.

या स्पर्धेमध्ये प्रथम वर्ष वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत आपली गुणवत्ता सिद्ध केली. या स्पर्धेचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांमध्ये वाणिज्य विषयातील वेगवेगळ्या संकल्पना व ज्ञानाची वृद्धी व्हावी हा होता. या स्पर्धेचे यशस्वी आयोजनाबद्दल वाणिज्य विभाग प्रा. विशाल देशमुख यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे व संयोजकांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेचे आयोजन प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच स्पर्धेच्या शेवटी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले व उपस्थिततांचे आभार मानले. या स्पर्धेसाठी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# बोरघाटात हाईट बॅरिकेट्सची उभारणी

## अखेर आयआरबीकडून उपाय; अपघात रोखण्यास होणार मदत

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील अंडा पॉईंट दस्तुरी येथे उभारलेली हाईट्स बॅरिकेट्स (कमानी) ही टेम्पोच्या धडकेत पूर्णपणे जमीनदोस्त झाली असल्याने येथून अवजड आणि मोठी वाहनांची वाहतूक चालू होती.



आता आयआरबीने आज पुन्हा तिचे काम चालू करून ती मजबूत कमानी बनवली आहे, या कमानीमुळे अवजड वाहने आणि मोठी वाहने ही बोरघाटातून न जाता ती मुबंई पुणे एक्सप्रेसवेवरून मुंबईकडे जातात. मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून येणारी वाहने कमानी पूर्वी खंडाळा मार्गे येऊन ती एक्सप्रेसवेने न जाता ती बोरघाटातून खोपोली कडे जात होती त्यामुळे या बोरघाटात अनेक अपघात होऊन निष्पाप प्रवाशी आणि वाहन चालकांना आपला जीव गमवावे लागला आहे.

यावर उपाय म्हणून आयआरबी आणि बोरघाट पोलीस केंद्राचे तत्कालीन पोलीस निरीक्षक योगेश भोसले यांच्या संकल्पनेतून दस्तुरी येथे अंडा पॉईंड जवळ अडीच मिटरची कमानी आणि बोरघाटात जुन्या पोलीस चौकी जवळ एक कमानी टाकली अश्या दोन हाईट्स बॅरिकेट्स टाकल्या आहेत जेणेकरून मोठी आणि अवजड वाहने ही बोरघाटातुन न जाता ती मुंबई-पुणे एक्सप्रेसने मुंबईकडे जातात यामुळे या बोरघाटात वारंवार होणारे अपघात हे कमी झाले आहेत, मात्र काही वाहन चालक जाणून बुजून ही कमानीला वाहने धडकून कमानी तोडत असल्याचे पाहायला मिळत आहे, आणि वारंवार ही दस्तुरी येथील कमानी तोडत आहेत, या असा वाहन चालकांवर वाहतूक पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे,

या कमानीमुळे आता बोरघाटातून खोपोलीकडे फक्त कार आणि हलकी वाहने जात असल्याने अपघात कमी झाले आहेत यामुळे स्थानिकांना समाधान व्यक्त केले आहेत.

# चौक परिसरामध्ये भाजपतर्फे सेवा पंधरवडा

**चौक : प्रतिनिधी**

सेवा पंधरवडा निमित्ताने राष्ट्र नेता ते राष्ट्रपिता या कार्यक्रमाच्या निमित्ताने चौक परिसरातील भाजपच्या वतीने सेवा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.



देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसाचे औचित्य साधून सेवा पंधरवडा समर्पण अभियानाच्या निमित्ताने उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली चौक परिसरात भारतीय जनता पक्षाच्या वतीने स्वच्छता अभियान व आरोग्य शिबाराचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाला सुरुवात झाली.

जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मोतीराम शेठ ठोंबरे, खालापूर मंडळाचे अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी सरपंच राजू मोरे,चौक सरपंच रितू ठोंबरे, तुपगाव सरपंच रवींद्र कुंभार, वडगाव पंचायत समितीचे अध्यक्ष विनोद भोईर, चौक अध्यक्ष गणेश कदम, विजय ठोसर, सागर ओसवाल, तुपगांव उपसरपंच सचिन साखरे यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे सदस्य, युवा मोर्चा, महिला आघाडी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सेवा पंधरवडा हे निमित्त आहे, मात्र जनतेच्या हितासाठी आपण सतत सकारात्मक राहूया, परिसराचा विकास याच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शुभेच्छा होईल, असे प्रतिपादन उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांनी केले.

## आज श्री अष्टविनायक पतसंस्थेची वार्षिक सभा

**नागोठणे : बातमीदार**

आपल्या पारदर्शक कारभारमुळे तसेच संस्थेचे अध्यक्ष विलास चौलकर यांच्या कुशल नेतृत्वामुळे सर्वांना आपापलीशी वाटणारी नागोठणे विभागात आपला ठसा उमटवणारी श्री अष्टविनायक ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २७वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (दि.२०) सायंकाळी ४ वाजता श्री आराधना भवन नागोठणे येथे होणार असून या सभेसाठी सर्व सभासद व ग्रामस्थांनी उपस्थित राहण्याचे आवाहन पतसंस्थेचे अध्यक्ष विलास चौलकर यांनी केले आहे.

श्री अष्टविनायक पतसंस्थेचे अध्यक्ष विलास चौलकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी प्रमुख अतिथी म्हणून कोकण विभाग नागरी सहकारी पतसंस्था संघ अध्यक्ष गिरीश तुळपुळे, नागोठणे पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी, रजिपचे निवृत्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी शरद वाडेकर, शासकीय लेखापरिक्षक दिनेश कोळी आदी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे औचित्य साधून गुणवंत विध्यार्थी व विविध क्षेत्रात विशेष कर्तृत्व केलेल्या मान्यवरांचा सत्कार केला जाणार असल्याची माहिती पतसंस्थेचे सचिव प्रफुल नागोठणेकर यांनी दिली आहे.

# नवरात्र मंडळांनी उत्सव शांततेत करावा –सचिन पवार

**चौक : प्रतिनिधी**

येणारा नवरात्र उत्सव अतिशय चांगल्या पद्धतीने साजरा करण्यात यावा, कोणतीही अडचण असल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले आहे.



नवरात्र उत्सवाला २२ सप्टेंबर रोजी प्रारंभ होत आहे, त्या अनुषंगाने खालापूर पोलीस ठाणे अंतर्गत सर्व नवरात्र उत्सव मंडळ, गाव पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते यांची बैठक खालापूर पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आली होती, त्या प्रसंगी मार्गदर्शन करताना त्यांनी आवाहन केले. मंडळानी नवरात्र उत्सव साजरा करताना डी जे मुक्त करावयाचा असून, गावातील नवरात्रौत्सवाची पुर्व परवानगी पोलीस ठाणेकडून घेण्यात यावी.

संबंधित स्थानिक प्रशासन नगरपालिका/ग्रामपंचायत यांचा नाहरकत दाखला महत्वाचा आहे, पोलीस ठाणेची ऑनलाईन नवरात्रौत्सव परवानगी घ्यावी,http://citizen.mahapolice.gov.in/Citizen/MH/index.aspx या वेबसाईटव्दारे अर्ज करावा.

आपले सरकार या पोर्टल वरुन स्पिकर परवानगी अर्ज सादर करावा. नवरात्रौत्सवासाठी तयार केलेले मंडप व्यवस्थीत व मजबुत असावे जेणेकरुन ते पावसामध्ये टिकेल तसेच मंडप ज्या ठिकाणी बांधायचे आहे ती जागा सार्वजनिक किंवा खाजगी असल्यास त्याप्रमाणे परवानगी घ्यावी जेणेकरुन वाद होवु नये, मुर्तीच्या सुरक्षिततेची जबाबदारी आयोजक व संपुर्ण कमिटीची राहील. २४ तास स्वयंसेवक नेमण्यात यावेत, मुर्ती व मंडप परीसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, मंडपाचे ठिकाणी प्रकाश व्यवस्थेसाठी विदयुत महामंडळाकडुन कायदेशीर मीटर घ्यावे. वायरींग व्यवस्थीत केलेली असल्याची टेक्नीशियनचे प्रमाणपत्र घ्यावे. मागील वर्षी वावोशी येथे नवरात्रौत्सवामध्ये शॉक लागुन मयत झालेली घटना घडलेली आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना कराव्यात.

गरबा दांडीया खेळताना रस्त्यावर अडथळा होवु नये. गरबा दांडीयाची आक्षेपार्ह, बिभत्स गाणी वाजवु नयेत. गरबा, दांडीया खेळताना महिला छेडछाड, विनयभंग यासारखे प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. मद्य प्राशन करुन, व्यसन करुन गरबा दांडिया खेळणार नाही याची आयोजकांनी दक्षता घ्यावी. ध्वनी प्रदुषणासंदर्भातील नियमांचे व तरतुदींचे पालन करण्यात यावे. स्पीकर परवानगी घ्यावी. डी.जे/डॉल्बी ला परवानगी नाही. रात्री १०.०० वाजेपर्यंत स्पीकर परवानगी असेल. नवरात्रौत्सवामध्ये जातीय, धार्मिक, राजकीय तेढ निर्माण होणारे बॅनर, मजकुर, देखावे लावु नये. मुर्ती विसर्जन मिरवणुक वेळी व विसर्जन ठिकाणी स्वयंसेवक व इतर उपाययोजना कराव्यात. संपर्क झालाच नाही तर ११२ डायल करण्यात यावा असे सांगून गाव पोलीस पाटील यांनी सतर्क राहणे महत्त्वाचे आहे, असे सांगितले.

या वेळी सहायक पोलीस निरीक्षक मनिष मोरे, चौक प्रभारी विशाल पवार, पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत ठोंबरे,सामाजिक कार्यकर्ते जगदीश हातमोडे, सचिन मते, यांच्यासह तालुक्यातील मंडळाचे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते, गाव पोलीस पाटील उपस्थित होते.

# नांदगावमध्ये दिव्यांगांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रुप ग्रामपंचायत नांदगावच्या सहकार्याने व के.बी.हाजी बच्चूअली नेत्र रुग्णालय मुंबई यांच्या मार्फत रायगड जिल्हा नेत्र आरोग्य प्रकल्पांतर्गत नांदगाव मधील दिव्यांगांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नांदगाव मराठी शाळा नं १ शाळेच्या सभागृहात गुरुवारी झालेल्या या शिबिरात नांदगाव व आजुबाजूच्या परिसरातील दिव्यांगांनी मोठ्या संख्येने या शिबिराचा लाभ घेतला. या शिबिरासाठी साईट सेव्हर इंडिया या संस्थेचे जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक आदित्य बनसोडे, के.बी.एच.बी.नेत्र रुग्णालयाचे प्रकल्प समन्वयक सचिन मोरे, मुरूडच्या नेत्र तपासणी केंद्राचे आकाश चाळके, आरोग्य सेवक कल्पीत कोळी व सौमित्री चरकारी आदींनी मोठे परिश्रम घेतले.

या वेळी नांदगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सेजलताई घुमकर, ग्रामसेवक प्रमोद म्हात्रे, सदस्य विक्रांत कुबल अन्य सदस्य व कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.



# रोह्यात कृषी अधिकारी व शेतकऱ्यांना प्रशिक्षण

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद व श्री.विवेकानंद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्युट रोहा यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद कृषी विभागाअंतर्गत १५ तालुक्यातील सर्व कृषी विस्तार अधिकारी, कृषी अधिकारी व शेतकरी यांचे दहा ड्रम थिअरी, अचूक शेती, कृषी क्षेत्रात एआय व चॅटजीटीपीचा वापर, बांबु लागवड या विषयावर



एक दिवसीय प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले होते.

महाराष्ट्रात प्रथम जिल्हा परिषद सेस फंडाच्या माध्यमातून अचुक शेती ही योजना राबविणारी रायगड जिल्हा परिषद ही एकमेव जिल्हा परिषद आहे. या प्रशिक्षणास रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत बडे, कृषी विकास अधिकारी पवनकुमार नजन, रोहा तालुका गट विकास अधिकारी शुभदा पाटील, जिल्हा कृषी अधिकारी निकिता सूर्यवंशी, महेश नारायणकर, आकाश यादव, कृषी अधिकारी अशोक महामुनी, पंचायत समिती कृषी अधिकारी रणजीत लवटे, एक्सेल इंडस्ट्रीजचे मॅनेजर नितेश जोशी हे मान्यवर उपस्थित होते.

प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित शेतकऱ्यांना मान्यवरांचे हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. उपस्थित शेतकऱ्यांपैकी रुपेश मगर, रवींद्र मगर, खेळु थिटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# वरई येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

वरई येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना श्री साई ट्रस्ट आणि ट्रू वरशिप या दोन संस्थांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

तेथे सर्व विद्यार्थ्यांना पुरेल एवढे एक वर्षाचे शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना देण्यात आले. ट्रस्टच्या संचालिका जयश्री जेठवाणी, संचालिका राधिका घुले, माणगावतर्फे वरेडी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले, प्रदीप सैंदाने यांच्या सह शिक्षक वर्ग उपस्थित होता.



# रोहा तालुक्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानास सुरुवात

**रोहे : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५ या अभियाना अंतर्गत बुधवारी (दि.१७) ग्रामपंचायत कार्यालय आंबेवाडी येथे विशेष ग्रामसभा आयोजित केली होती. या वेळी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवस साजरा करून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.



या ग्रामसभे मध्ये प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान ग्रामस्थरीय समितीची स्थापना करण्यात आली. या समितीमध्ये ग्रामपंचायत माजी सरपंच उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील, मुख्याध्यापक, ग्राममहसूल अधिकारी, कृषी सहाय्यक, वैद्यकीय अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांचा समाविष्ट करण्यात आले.

या वेळी ग्रामपंचायत अधिकारी यांनी उपस्थितांना अभियानाची माहिती देत आपले प्रास्ताविक सादर केले ग्रामपंचायतसाठी नेमणूक करण्यात आलेल्या संपर्क अधिकारी सुनील गायकवाड यांनी अभियानाची माहिती, हेतू, व उद्दिष्ट समजावून सांगितली. जिल्हा नोडल अधिकारी महादेव टेले यांनी या अभियानात सर्वांना स्वेच्छेने सहभागी होण्याचे आवाहन केले. मंडळ अधिकारी श्री पाटील यांनी फार्मर आयडी कार्ड, पाणंद रस्ते, ई पीक पाहणी या संदर्भात माहिती दिली. ग्राममहसूल अधिकारी ई पिक पाहणी, फार्मर आयडी या संदर्भात आयोजित करण्यात येणाऱ्या कॅम्पमध्ये जास्तीत जास्त लोकांनी आयडी काढण्याबाबत आयोजित केले. सुशोभीकरण करण्यासंदर्भात गटविकास अधिकारी शुभदा पाटील यांनी शुभेच्छा व मार्गदर्शन केले.

या वेळी माजी सरपंच सुरेश महाबळे, संजय कुरळे, चंद्रकांत लोखंडे, वाचकडे, प्रीतम पाटील, ग्रामसेवक दिलीप पाबरेकर, आरोग्य सेवक, आशा स्वंयसेवका, अंगणवाडी सेविका, पोलिस पाटील, ग्रामसंघ अध्यक्ष, लिपिक, बचत गट CRP, ग्रामरोजगार सहाय्यक, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# भाजप युवा मोर्चा रोहा तालुका अध्यक्षपदी निखील मढवी

**नागोठणे : बातमीदार**

कोंडगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विद्यमान सदस्य निखील बाळाराम मढवी यांची युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे व दक्षिण रायगड युवा मोर्चा अध्यक्ष निलेश थोरे यांच्या शिफारशीने तसेच खासदार धैर्यशील पाटील यांच्या आशीर्वादाने भाजप युवा मोर्चा रोहा तालुका अध्यक्षपदी भाजप रोहा ता. अध्यक्ष महेश ठाकूर यांनी नियुक्ती केली.



पेण येथे एका कार्यक्रमात निखिल मढवी यांना खासदार धर्यशिलदादा पाटील यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, रोहा ता. अध्यक्ष महेश ठाकूर व ॲड. गणेश जाधव उपस्थित होते. दरम्यान नवनिर्वाचित रोहा तालुका अध्यक्ष निखिल मढवी यांच्यावर विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

भाजप रोहा तालुका अध्यक्ष महेश ठाकूर यांनी निखिल मढवी यांना दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, भारतीय जनता पक्षातील आपले योगदान लक्षात घेऊन आपली भाजप रोहा तालुका मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष या पदावर नियुक्ती करण्यात येत आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण साहेब, राज्याचे विकास पुरुष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धर्यशिल पाटील साहेब, रायगड लोकसभा प्रमुख सतिश धारप, पेणचे आमदार रविशेठ पाटील साहेब यांना अभिप्रेत कार्य आपल्या हातून घडेल यावर मला विश्वास आहे.

# महाविस्तार ॲपच्या वापराबाबत आवाहन

**रायगड :** शासनाच्या कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी एक नवीन ॲप सुरू करण्यात आले आहे. शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र असे या ॲप विषयी वर्णन केले जाते. आपल्या शेतकरी बांधवांना आता या एका ॲपमध्येच शेतीविषयक योजनाविषयी सर्व माहिती उपलब्ध आहे. या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना हवामानविषयक माहिती, पीक सल्ला पिकासाठी लागणारी खताची मात्रा, कीड व रोगाविषयी माहिती तसेच तुम्ही पिकविलेल्या मालाचा बाजारभावही बघता येणार असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी दिली आहे.

अगदी एका क्लिकवर शेतीसाठी लागणारी यंत्र अवजारे भाडेतत्त्वावर मिळविण्याकरिता त्यांच्या गावाच्या जवळपास असणाऱ्या अवजारे बँकांची माहितीदेखील या ॲपवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प व महाडीबीटीवर असणाऱ्या सर्व योजनांची सविस्तर माहिती अर्थात त्यातील विविध घटकाकरिता अर्ज कसा करावा, आवश्यक कागदपत्रे या सर्वांची माहिती या ॲपमध्ये समाविष्ट आहे. ऑनलाईन शेती शाळा नवनवीन तंत्रज्ञानाचे व्हिडिओदेखील या ॲपच्या माध्यमातून शेतकरी बंधू बघू शकतात.

याकरिता शेतकरी बांधवांनी प्ले स्टोअर वरून महाविस्तार ॲप डाऊनलोड करून घ्यावा. त्यानंतर आपल्या शेतकरी आयडीने लॉगईन करून आपले नाव, गाव, तालुका प्रविष्ठ करायचा आहे. जेणेकरून त्यांची गावनिहाय, तालुकानिहाय सर्व माहिती त्यांना उपलब्ध होईल.

# डॉ. विश्वास देशमुख यांना पुरस्कार

**धाटाव :** तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित डॉ. नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवे-कोलाड यांचे प्राचार्य डॉ. विश्वास देशमुख यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला असून खोपोली येथे आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. हा मानाचा पुरस्कार कोकण शिक्षक पदवीधर मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते माधवबाग येथे डॉ. देशमुख सरांना देण्यात आला.



# आशिया कपमधून अफगाणिस्तान बाहेर

## श्रीलंकेचा सहा गडी राखून विजय; तुषारा, मेंडिसचे योगदान

**अबुधाबी : वृत्तसंस्था**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी श्रीलंकेने अफगाणिस्तानवर सहा गडी आणि आठ चेंडू राखून विजयाची नोंद केली. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १६९ धावसंख्या उभारली होती. १७० धावांचे आव्हान श्रीलंकेने १८.४ षटकांत ४ बाद १७१ धावा काढत पूर्ण केले. श्रीलंकेच्या विजयामध्ये सलामीवीर कुशल मेंडिसने दमदार अर्धशतकी खेळी आणि नुआन तुषाराने भेदक गोलंदाजी करत सिंहाचा वाटा उचलला.



प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानची सुरुवात खराब झाली. त्यांचे सलामीवीर लवकर बाद झाले, परंतु त्यानंतर मोहम्मद नबी (६०) आणि कर्णधार राशीद खान (२४) यांनी संघाचा डाव सावरत संघाला १६९ धावसंख्येपर्यंत पोहचवले. श्रीलंकेकडून वेगवान गोलंदाज नुवान तुषाराने भेदक गोलंदाजी करत १८ धावांत चार बळी घेऊन अफगाणिस्तानच्या डावाला सुरुंग लावला. वानिंदू हसरंगानेही किफायती गोलंदाजी करत चार षटकांत केवळ १८ धावा दिल्या.

१७० धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या श्रीलंकेचा सलामीवीर पथुम निसांका (६) लवकर बाद झाला. त्यानंतर दुसरा सलामीवीर कुशल मेंडिसने (५२ चेंडूंत १० चौकारांसह ७४ नाबाद) एक बाजू लावत संघाला विजयाकडे नेले. त्याला कुशल परेरा (२० चेंडूंत तीन चौकारांसह २८) आणि कामिंदू मेंडिस (१३ चेंडूंत दोन षटकारांसह २६ नाबाद) यांनी चांगली साथ दिली. अफगाणिस्तानच्या अझमतुल्ला ओमरझाई, मोहम्मद नबी, मुजीब उर रहमान आणि नूर अहमद या गोलंदाजांनी प्रत्येकी एक बळी घेतला, पण श्रीलंकेच्या फलंदाजांवर दबाव निर्माण करण्यात त्यांना यश आले नाही. कर्णधार राशीद खानने चार षटकांत २३ धावा दिल्या, मात्र त्याला बळी घेण्यात अपयश आले.

# माथेरानचे विद्यार्थी रिलेत अव्वल

## रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान येथील प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर शाळेच्या विद्यार्थ्यांनी कर्जत तालुकास्तरीय रिले शर्यतीत प्रथम क्रमांक पटकाविला. त्यामुळे या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्य क्रीडा व युवक कल्याण संचालनालय आयोजित कर्जत तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत माथेरानच्या प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिरमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यांनी १७ वर्षाखालील मुलांच्या वयोगटातील ४X१०० रिले रेस जिंकली.

यशस्वी धावपटूंमध्ये संस्कार सुरेश शिंदे, श्रेयस गणेश साबळे, अक्षय रमेश आखाडे, जानू विवेक अंकुश आखाडे, सुफियान सैफुल्लाह शेख यांचा समावेश होता. त्यांना शालेय शिक्षक संघपाल वाठोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

या संघाची आता जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# पावसाळी क्रीडा स्पर्धेत मोरा येथील न्यू इंग्लिश स्कूलची चमक



**उरण : वार्ताहर**

उरण तालुकास्तरीय पावसाळी शालेय क्रीडा स्पर्धेत जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या उरण मोरा येथील न्यू इंग्लिश स्कूल संघाने खो-खो स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. याशिवाय अन्य खेळांमध्येही या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चमक दाखवली आहे.

मैदानी क्रीडा स्पर्धेत प्रणाली प्रकाश कातकरी हिने १७ वर्षे वयोगटात ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांक, अश्विनी आत्माराम कातकरी १९ वर्षे वयोगटात १५०० मीटर धावणे प्रथम क्रमांक, १७ वर्षे वयोगटात ४X४०० मी. रिले प्रथम व ४X१०० मी. रिलेमध्ये तृतीय क्रमांक, १७ वर्षे वयोगटात ममता राजकुमार चौगुले १५०० मीटर धावणे द्वितीय क्रमांक, अश्विनी आत्माराम कातकरी ३००० मीटर धावणे तृतीय क्रमांक, अंकिता अनुप गौंड ४०० मीटर धावणे तृतीय क्रमांक आणि १४ वर्षे वयोगटात कोमल नडगिरी ६०० मीटर धावणे तृतीय क्रमांक प्राप्त केला. प्रथम व द्वितीय क्रमांक विजेत्या स्पर्धकांची रायगड जिल्हास्तरावर निवड झाली आहे.

या विद्यार्थ्यांना प्रभारी मुख्याध्यापक साईनाथ गावंड, मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर, क्रीडा शिक्षक अनिल पाटील, वरिष्ठ शिक्षक मनोज म्हात्रे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळा कमिटी, संस्थाप्रमुख, अध्यक्ष यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत पी.व्ही. सिंधू उपांत्यपूर्व फेरीत

**शेंझेन : वृत्तसंस्था**

भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूने चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. तिने थायलंडच्या सहाव्या मानांकित पोर्नपावी चोचुवोंगचा २१-१५, २१-१५ असा सरळ गेममध्ये पराभव केला. हा सामना अवघ्या ४१ मिनिटांत संपला.



या विजयामुळे दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेत्या सिंधूने थाई खेळाडूविरुद्धच्या हेड-टू-हेड रेकॉर्डमध्ये ६-५ अशी आघाडी घेतली आहे. उपांत्यपूर्व फेरीत सिंधूचा सामना कोरियाच्या अव्वल मानांकित एन से यंग आणि डेन्मार्कच्या मिया ब्लिचफेल्ड यांच्यातील विजेत्याशी होईल. अलीकडेच हाँगकाँग ओपनमधून पहिल्याच फेरीत बाहेर पडलेल्या सिंधूने या विजयाबद्दल आनंद व्यक्त केला.

दरम्यान, पुरुष दुहेरीत भारताच्या सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने चायनीज तैपेईच्या हिसयांग चिएह चिऊ आणि वांग चि-लिन या जोडीला ३२ मिनिटांत २१-१३, २१-१२ असे सहज हरवले.

# श्रीलंकेच्या कुशल परेराने टिपला अफलातून झेल

**अबुधाबी : वृत्तसंस्था**

श्रीलंका आणि अफगाणिस्तान यांच्यात आशिया चषक स्पर्धेच्या साखळी फेरीतील अखेरला सामना अबूधाबीतील झायेद क्रिकेट स्टेडियमवर रंगला. सुपर फोरचे चित्र स्पष्ट होण्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या सामन्यात श्रीलंकेच्या ताफ्यातील कुशल परेरा याने क्षेत्ररक्षणाचा सर्वोत्तम नमुना पेश केला. स्लिपमध्ये अफगाणिस्तानसा सलामीवीर गुरबाझचा अप्रतिम झेल टिपत आधी त्याने संघाला पहिले यश मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यानंतर सीमारेषेवर षटकाराचे रूपांत झेलमध्ये करत त्याने फिल्डिंगच्या जोरावर संघाला यश मिळवून दिले.

नवुमा थुसारा याने सुरुवातीला दिलेल्या धक्क्यातून सावरताना अफगाणिस्तानच्या संघाने १० षटकानंतर ३ बाद ६३ धावा केल्या होत्या. इब्राहिम झादरान आणि दरविश रसूली ही जोडी मैदानात खेळत होती. ११व्या षटकात दुष्मंथा चमिरा गोलंदाजीला आला. त्याने टाकलेल्या आखूड टप्प्याच्या चेंडूवर दरवशील याने मोठा फटका खेळला, पण कुसल परेराने उत्तम क्षेत्ररक्षण करत फक्त चेंडू अडवला नाही, तर सहा धावा मिळवून देणाऱ्या चेंडूवर अफगाणिस्तानला धक्का दिला. सीमारेषेवर परेराने जबरदस्त झेल टिपला.



### सूर्यकुमारच्या कॅचची आठवण

*डीप थर्ड मॅनवर फिल्डिंग करत असलेल्या कुसल परेराने क्षेत्ररक्षणातील कौशल्य दाखवून देताना आधी उडी मारून चेंडू पकडला, पण सीमारेषेच्या अगदी जवळ आलोय हे लक्षात आल्यावर त्याने चेंडू हवेत उडवला. मग क्षणात सीमारेषेबाहेर जाऊन पुन्हा तो मैदानात आला अन् झेल यशस्वीरित्या पूर्ण केला. हा झेल २०२४च्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील फायनलमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सूर्यकुमार यादवने घेतलेल्या कॅचची आठवण करून देणारा ठरला.*

# झहीर खानने सोडली लखनौ सुपर जाएंट्सची साथ

**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या आगामी हंगामाआधी झहीर खान याने लखनौ सुपर जाएंट्सची साथ सोडली आहे. २०२५च्या हंगामात झहीरची टीम इंडियाचा विद्यमान कोच गौतम गंभीर याच्या जागी संजीव गोएंका यांच्या मालकीच्या एलएलजी संघाच्या ताफ्यात मेंटॉरच्या रूपात नियुक्त करण्यात आली होती.


झहीरने ऑगस्ट २०२४मध्ये लखनऊसोबत दोन वर्षांचा करार केला होता. त्याच्याकडे संघ बांधणी व कामगिरी उंचावण्यासाठी रणनिती तयार करण्याची प्रमुख जबाबदारी होती. २०१८ ते २००२२ या काळात मुंबई इंडियन्ससोबत त्याला कामाचा अनुभव होता. गौतम गंभीरची जागा घेतल्यानंतर झहीरने गत हंगामासाठी संघ बांधणी करताना काही महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यात ऋषभ पंतवर लागलेल्या विक्रमी बोलीचाही समावेश होता. एवढेच नाही तर मिचेल मार्श आणि मार्करम या जोडीचा ओपनिंगचा यशस्वी प्रयोग अन् निकोल पूरनचा योग्य वापर करून घेण्यात तो यशस्वी ठरला, पण गत हंगामात एलएसजीच्या संघाला १४पैकी फक्त सहा सामन्यातच विजय मिळवता आला.

ईएसपीएन क्रिकइन्फोनुसार एलएसजी संघाचा मुख्य प्रशिक्षक जस्टिन लँगर आणि संघ मालक संजीव गोयंका यांच्यासोबतच्या मतभेदामुळे झहीरने संघाच्या ताफ्यातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

# उलवे नोडमध्ये २८ सप्टेंबरला राष्ट्रीय कराटे स्पर्धेचा थरार

**नवी मुंबई : बातमीदार**

युनिव्हर्स कराटे मार्शल आर्ट्स अकॅडमी इंडियाच्या वतीने खुली राष्ट्रीय कराटे स्पर्धा २८ सप्टेंबर रोजी उलवे नोडमधील बामणडोंगरी येथील भूमिपुत्र भवनात आयोजित करण्यात आली आहे. अकॅडमीचे अध्यक्ष शिहान शिवाजी ढवळे यांनी ही माहिती दिली.



कराटेपटूंना आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचण्यासाठी व्यासपीठ मिळावे, त्यांचा सराव आणि आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील कराटेपटूंना एकत्र आणणारी ही स्पर्धा राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्वतःला सिद्ध करण्याची मोठी संधी ठरणार आहे.

या स्पर्धेला मुंबई पोलीस उपायुक्त (सायबर गुन्हे) पुरुषोत्तम कराड, कराटे दो असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष शिहान सल्लाउद्दीन अन्सारी व सेक्रेटरी शिहान संदीप गाडे उपस्थित राहून खेळाडूंचे मनोबल वाढवतील.

स्पर्धेच्या आयोजनात शिहान शंकर शेलार, सेन्सई महेश दाभाडे, सायली सरवणकर, सुरेश माने, सोनाली माने, सोहम सरवणकर यांच्यासह मारुती पाटील, सिद्धेश सरवणकर, सचिन औताडे, उदय शिंदे, मयुरी प्रजापती, अंजली बोराटे, जाणशी बंदिचोडे, कायनात पावणे, साक्षी करडे, सुशांत पालवे, निलेश धोंडे, आर्यन सावंत, राफेल नदार, अलोक वर्मा, आर्यन भोसले, मानसी गोडसे आदी सक्रिय योगदान देत आहेत.

# ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटीत जुरेल, पडिक्कलची शतके

**लखनऊ : वृत्तसंस्था**

भारताचा अ संघ सध्या ऑस्ट्रेलियाच्या अ संघाविरुद्ध अनऑफिशियल कसोटी सामना खेळत आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाच्या संघाने मोठी धावसंख्या उभारली, तर प्रत्युत्तरात भारताने चांगली झुंज दिली आहे. या सामन्यात भारताकडून प्रथम ध्रुव जुरेलने शतकी खेळी केली. त्यानंतर देवदत्त पडिक्कलने दीडशतक ठोकले.



कर्नाटकचा फलंदाज देवदत्त पडिक्कलने भारत अ संघात पुनरागमन करताना शतक झळकावले. शुक्रवारी लखनौमध्ये ऑस्ट्रेलिया अ विरुद्ध त्याने आपले सातवे प्रथम श्रेणी शतक पूर्ण केले. ८६ धावांच्या पुढे खेळत पडिक्कलने शुक्रवारी सकाळी २० चेंडूत आपले शतक पूर्ण केले. त्याच्या या खेळीमुळे भारत ऑस्ट्रेलिया अ संघाच्या पहिल्या डावातील ६ बाद ५३२ धावांच्या विशाल धावसंख्येच्या जवळ पोहचला.

या खेळीदरम्यान पडिक्कलने तीन हजार प्रथम श्रेणी धावा पूर्ण केल्या. त्याने आपल्या ७४व्या डावात हा टप्पा गाठला. २५ वर्षीय पडिक्कल यंदा आपला दुसराच स्पर्धात्मक सामना खेळत आहे. तो आयपीएल २०२५च्या चॅम्पियन रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा भाग होता. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या अनऑफिशियल कसोटीत त्याने भारत अ संघाच्या पहिल्या डावात २८१ चेंडूत १४ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने १५० धावा केल्या.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या या सामन्यात ध्रुव जुरेलची बॅटदेखील तळपली. त्याच्या शतकी खेळीच्या जोरावर भारताने सामन्यातील आपले आव्हान कायम ठेवले. एका टोकाला पडिक्कल ठामपणे उभा असताना, जुरेलने पुन्हा एकदा दाखवून दिले की ऋषभ पंतनंतर तोच सर्वोत्तम यष्टिरक्षक आहे.

जुरेलने अप्रतिम प्रतिआक्रमण करताना ११४ चेंडूत दहा चौकार आणि चार षटकार लगावत शतकी खेळी केली. विशेष म्हणजे त्याने ऑफ-स्पिनर रोक्किचोलीविरुद्ध धावा करताना केवळ ४६ चेंडूत तब्बल ४७ धावा केल्या, ज्यात तीन षटकारांचा समावेश होता.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com